## सावंतवाडीतील शिरोडा वेळागर समुद्रात आठ पर्यटक बुडाले



**सावंतवाडी :** शिरोडा वेळागर येथील समुद्रात अंघोळीसाठी जाणे बेळगाव तसेच कुडाळ येथील कित्तूर व मणियार कुटुंबियांच्या जीवावर बेतले असून तब्बल आठ जण समुद्राच्या लाटेत बेपत्ता झाले. त्यातील तिघांचे मृतदेह सापडले आहेत. एका मुलीला वाचविण्यात यश आले आहे, तर उर्वरित चार जणांचा शोध घेण्याचे काम सुरू असून उशिरापर्यंत त्याचा शोध लागला नव्हता. समुद्रात उतरणाऱ्यांमध्ये सहा जण बेळगाव, तर दोघेजण कुडाळ येथील असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. ही घटना शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास वेळागर सुरूची बागेसमोर समुद्राची आलेली लाट आणि किनाऱ्यावर असलेला खोल खड्डा यामुळे घडली असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. शोधकार्य मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. स्थानिक मच्छीमार तसेच लाईफ गार्डच्या मदतीने चार जणांचा शोध घेण्यात येत आहे.

रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ७७
www.ramprahar.com

शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### अंतरंग

खालापूरमध्ये खैराची तस्करी वनविभागाने पकडली / २

अल्पवयीन मुलीसोबत लैंगिक चाळे; गुन्हा दाखल / ५

भारताची विंडीजवर भरभक्कम आघाडी; तिघांची शतके / ८

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव!

### येत्या तीन महिन्यात प्रक्रिया पूर्ण करणार -मुख्यमंत्री

### सर्वपक्षीय कृती समितीसोबत बैठकीत नावावर शिक्कामोर्तब



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचेच नाव लागणार असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.३) झालेल्या सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीत या संदर्भात मोठा निर्णय झाला. या वेळी नामकरणाची प्रक्रिया येत्या तीन महिन्यांच्या आत पूर्ण करू, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील आणि उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिली.

लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी सर्वपक्षीय कृती समिती गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न व पाठपुरावा करत होती. आंदोलने, मोर्चे, मानवी साखळी, बैठका, जनजागृती, लाखो भूमिपुत्रांच्या उपस्थितीत सिडको घेराव आंदोलन अशा अनेक प्रकारे लढा देत 'दिबां'च्या नावाचा जोरदार गजर करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृहात कृती समितीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत शुक्रवारी महत्त्वपूर्ण बैठक झाली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य आणि केंद्र सरकार लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाबाबत सकारात्मक असून येत्या तीन महिन्यांच्या आत केंद्राच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव दिले जाईल, अशी माहिती दिल्याचे कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी बैठक संपल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

दशरथ पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील तीन विमानतळांच्या नामकरणासंदर्भात मुख्यमंत्र्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा झाली आहे. केंद्र सरकार एक फॉरमॅट राज्य सरकारला देणार आहे. तो फॉरमॅट राज्य सरकारने केंद्राकडे पाठवल्यानंतर तीन महिन्यांच्या आत नामकरणाचा विषय पूर्ण केला जाईल.

या बैठकीला भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, राज्याचे माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी आमदार राजू पाटील, सुभाष भोईर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, जे.डी. तांडेल, संतोष केणे, नंदराज मुंगाजी, नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्यासह सर्वपक्षीय कृती समितीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ८ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या पार्श्वभूमीवर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचेच नाव लागणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.

### 'दिबां'च्या नावासाठी राज्य सरकार ठाम -आमदार प्रशांत ठाकूर



या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागले पाहिजे ही भूमिपुत्रांची आणि प्रकल्पग्रस्तांची इच्छा होती. यासाठी २०२१ साली जून महिन्यात आम्ही आंदोलने पुकारली. वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने केल्यावर एक वर्षानंतर जेव्हा महायुतीचे सरकार राज्यात आले त्या वेळी सरकारने पहिल्याच कॅबिनेटमध्ये याबाबत निर्णय घेतला. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात तो पास केला. केंद्र सरकारची मंजुरी मिळत नाही म्हणून अलिकडच्या काळात ज्या लोकांचा आंदोलनाशी काही संबंध नाही अशांकडून चर्चा सुरू झाल्या व संभ्रम निर्माण केला गेला. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीला सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, राज्य सरकारने दि.बा. पाटील यांचेच नाव केंद्र सरकारकडे पाठवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी गेल्याच आठवड्यात चर्चा केली आणि त्यानंतर पंतप्रधानांनी सांगितले की, राज्य सरकारने पाठविलेलेच नाव आम्ही स्वीकारत असतो. त्या संदर्भातील जी प्रक्रिया आहे त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर विमानतळाच्या नावाचा निर्णयही प्रलंबित आहे. संत तुकाराम महाराजांचे नाव पुणे विमानतळाला देण्याचा निर्णयसुद्धा प्रलंबित आहे. त्यामुळे केवळ एकट्या दि.बा.पाटीलसाहेबांच्या नावाचा निर्णय प्रलंबित नाही. राज्य सरकार याबाबतीत ठाम आहे. केंद्र सरकारकडून कुठल्याही प्रकारची अडचण नाही. प्रक्रिया पूर्ण होईल आणि 'दिबां'चे नाव दिले जाईल.

#### कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

## विवेक पाटील यांची ५१ कोटी रुपयांची जमीन लिलावात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणात गेल्या चार वर्षांपासून तुरुंगात असलेले शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार विवेक पाटील यांची पनवेल तालुक्यातील पोसरी येथील सुमारे १०० एकर जमीन महसूल विभागाने शुक्रवारी (दि. ३) जाहीर नोटीसीने लिलावात काढली. याची किंमत ५१ कोटी ३३ लाख १२ हजार ५०० रुपये आहे.

विवेक पाटील आणि संचालकांवर ५२९ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा ठपका आहे. बोगस कर्ज प्रकरण वाटणे आणि ती कर्ज रक्कम पुन्हा बँकेच्या तिजोरीत जमा न केल्याचे चौकशीत समोर आल्याने माजी आमदार विवेक पाटील यांना ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने जून २०२१मध्ये अटक केली होती. तेव्हापासून ते तुरूंगातच आहेत. ईडीबरोबरच सीआयडीनेसुद्धा या प्रकरणात वेगळा गुन्हा नोंदविल्यामुळे पाटील यांच्या अडचणी वाढल्या. त्याचप्रमाणे या दोन्ही तपास यंत्रणांनी न्यायालयात व्यवस्थित बाजू मांडल्यामुळे विवेक पाटील यांना जामीन मिळू शकला नाही.

विवेक पाटील यांना अटक केल्यानंतर चौकशीदरम्यान तपास यंत्रणेसमोर आणि न्यायालयासमोर त्यांच्या स्वतःच्या तसेच बँकेच्या मालकीच्या ८७ विविध मालमत्तांची यादी समोर आली. सरकारने कायदेशीर पद्धतीने बँक गैरव्यवहारातील रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरू केली होती. या दरम्यान पनवेलचे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पवन चांडक यांनी याबाबत शुक्रवारी वर्तमानपत्रातून पोसरी गावातील सर्वे क्रमांक ५१/१/अ यावरील ४१ हेक्टर सहा गुंठे जमीन क्षेत्राचा लिलाव ५१ कोटी ३३ लाख १२ हजार ५०० रुपये किमतीचा जाहीर केला. विवेक पाटील यांनी या सुमारे १०७ एकर जमिनीवर कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शंकरशेठ शिवराम पाटील कृषी पणन व व्यवस्थापन महाविद्यालय उभे करण्यासाठी खरेदी केल्याचे लेखाशिर्षकात दाखवले होते.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९मधील तरतुदी अन्वये महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने २४ नोव्हेंबर २०२२ रोजी आदेश पारित केले होते. या आदेशानुसार पनवेल येथील कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. या बँकेच्या मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने उपविभागीय अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

### निवडक

#### भारताने पाकची १० लढाऊ विमाने उद्ध्वस्त केल्याचा खुलासा

**नवी दिल्ली :** 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने पाकिस्तानची अमेरिकेत बनवलेली एफ-१६, चिनी जेएफ-१७सह ८-१० लढाऊ विमाने उद्ध्वस्त केली, असा खुलासा भारतीय हवाई दलाचे प्रमुख अमर प्रीत सिंह यांनी शुक्रवारी (दि. ३) केला. हा संघर्ष वेग आणि अचूकतेने उद्दिष्टे साध्य करणारा तसेच पाकिस्तानला गुडघे टेकायला लावणारा म्हणून इतिहासात लक्षात राहील, असेही ते ९३व्या हवाई दल दिनानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत म्हणाले.

#### सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाच्या तारखा जाहीर

**पुणे :** दरवर्षी रसिक श्रोते ज्या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात तो पुण्यातील सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव डिसेंबरमध्ये रंगणार आहे. आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे आयोजित यंदाचा ७१वा महोत्सव १० ते १४ डिसेंबर यादरम्यान मुकुंदनगर येथील कटारिया शाळेच्या प्रांगणात रंगणार आहे. संस्थेतर्फे कलाकारांची नावे आणि महोत्सवाचे वेळापत्रक लवकरच जाहीर होईल.

## महापालिका कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती पदोन्नती योजनेचा तत्काळ लाभ द्या

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती पदोन्नती योजनेचा तत्काळ लाभ देण्याची मागणी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महापालिकेमध्ये विविध विभागात कार्यरत असलेले कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी यांनी अनेक वर्षांपासून इमानेइतबारे सेवा बजावली आहे. शासनाच्या धोरणानुसार (आश्वासित प्रगती पदोन्नती योजना) १० वर्षे, २० वर्षे, ३० वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर लागू असतानाही प्रत्यक्षात अनेक कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. कर्मचाऱ्यांच्या सेवेत उत्साह टिकवून ठेवण्यासाठी व त्यांना न्याय देण्यासाठी सदर योजना तत्काळ राबविणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून या कर्मचाऱ्यांना आपल्या केलेल्या सेवेचा योग्य तो मोबदला मिळण्यास मदत होईल. त्यामुळे कामगारांच्या बाबतीत या महत्वपूर्ण विषयावर लक्ष केंद्रित करून महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून सर्व पात्र कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती पदोन्नती (१० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षे) योजनेचा लाभ लवकरात लवकर देण्याकरीता योग्य ती कार्यवाही करावी.

## 'आत्मनिर्भर भारत'मुळे देशाची ताकद वाढणार

### आमदार स्नेहा दुबे-पंडित यांचा विश्वास; पनवेलमध्ये कार्यशाळा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानामुळे देशाची ताकद वाढणार असून त्या जोरावर आपला भारत विकसित देशांच्या यादीत दाखल होईल, असे प्रतिपादन या अभियानाच्या प्रदेश सहसंयोजिका वसई मतदारसंघाच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी शुक्रवारी (दि. ३) येथे केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान २५ सप्टेंबर ते २५ डिसेंबरदरम्यान राबविण्यात येणार आहे. त्या संदर्भातील उत्तर रायगड जिल्हा कार्यशाळा आमदार स्नेहा दुबे-पंडित आणि भाजपचे ठाणे कोकण समन्वयक अभिजित पेडणेकर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्ड येथे झाली. त्या वेळी त्या बोलत होत्या

आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी या कार्यशाळेत संवाद साधत अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी पुढे बोलताना सांगितले की, आपला देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जलदगतीने विकास करत आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू केलेल्या आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानातून स्वदेशीचा गजर होणार आहे. या अभियानाचा उद्देश भारताला सर्व क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवणे तसेच रोजगारनिर्मिती, उद्योगविकास आणि स्थानिक उत्पादनांना चालना देणे हा आहे. या अभियानांतर्गत लोकल फॉर व्होकल हा मंत्र देत स्थानिक उत्पादक व उद्योजकांना प्रोत्साहन दिले जात आहे. कृषी, उद्योग, आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान आणि लघु-मध्यम उद्योग क्षेत्रात विशेष भर देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, तर युवकांना स्टार्टअपसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. (पान २ वर..)

## रायगडात वार्षिक १६ टक्के कमी पर्जन्य

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात यंदा वार्षिक पर्जन्यमानाच्या सरासरी ८३.७ टक्के पाऊस पडला. वार्षिक सरासरीच्या हा १६ टक्के कमी पाऊस आहे. असे असले तरी धरणक्षेत्रात चांगला पाऊस पडल्यामुळे लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८पैकी २६ लघुप्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. जिल्ह्यातील धरणांमध्ये ६८.९४३ दक्षलक्ष घनमीटर इतके उपयुक्त पाणी उपलब्ध आहे.

१ जून ते ३० सप्टेंबर हा मान्सूनचा कालावधी समजला जातो. शासनाकडे या चार महिन्यांतील पावसाची मान्सूनचा पाऊस म्हणून नोंद केली जाते. या काळात जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान तीन हजार १४८.६ मिलीमीटर आहे. जिल्ह्यात ३० सप्टेंबरपर्यंत २६३६.८ मिमी पाऊस नोंदला गेला. वार्षिक सरासरीच्या ८३.७ टक्के पाऊस पडला असून यंदा १६ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.

जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला, पण जुलै व ऑगस्ट महिन्यात पाऊस कमी पडला. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ६५५.८० मिमी पाऊस पडतो. यंदा ६९६.०० मिमी पावसाची नोंद झाली. जुलै महिन्यात साधारणपणे १२०६.२ मिमी पाऊस पडतो. यंदा ७६३.६ मिमीच पाऊस पडला. ऑगस्ट महिन्यात साधारणपणे ८७४.५ मिमी पाऊस होतो. त्या तुलनेत या वर्षी ७४४.२ मिमीच पाऊस झाला. सप्टेंबर महिन्यात ४१२ मिमी पाऊस पडतो. यंदा ४२९ मिमी पावसाची नोंद झाली.

वस्तूत: शासनाकडे जून ते सप्टेंबर या चार महिन्यांची मान्सूनचा पाऊस म्हणून नोंद केली जाते. यंदा मे महिन्यातच मान्सूनला सुरुवात झाली. मे महिन्यात ४५४.९५ मिमी पाऊस पडला, जो १४.६७ टक्के होता. मे महिन्यात पडलेल्या पावसाचा विचार केल्यास जिल्ह्यात ९७.७४ टक्के पाऊस पडला.

**तालुकानिहाय पाऊस (आकडेवारी टक्क्यांमध्ये)**

उरण ११६.९, अलिबाग १११.५, मुरूड १०६.५, पेण १०१.७, श्रीवर्धन ९४.३, म्हसळा व रोहा प्रत्येकी ९३.७, तळा ९३.१. पनवेल ९२.९, खालापूर ९०, महाड ८३.१, सुधागड ८०.८, माणगाव ८०.३, कर्जत ७४.१, पोलादपूर ७२.८ एकूण : ८३.७ टक्के.

यंदा दक्षिण रायगडपेक्षा उत्तर रायगडात जास्त पाऊस पडला. अलिबाग तालुक्यात सरासरीच्या १११.५ टक्के पावसाची नोंद झाली. उरण ११६.९ टक्के, पेण १०१.७ टक्के, तर मुरूडमध्ये १०६.५ टक्के पाऊस पडला. पोलादपूर तालुक्यात सरीसरीच्या ७२.८ टक्के कमी पाऊस पडला आहे. कर्जतमध्ये ७४.१, सुधागडात ८०.८ टक्के पाऊस पडला.

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात मोठे पूर, मोठी नैसर्गिक आपत्ती आली नाही. तरीदेखील ५२३ पक्क्या घरांचे, ९२ कच्च्या घरांचे व २० झोपड्यांचे नुकसान झाले. याशिवाय एक पोल्ट्रीचे आणि १२ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाले. चार जणांचा मृत्यू झाला. सप्टेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यात पडलेल्या पावसामुळे दोन हजार १८५ हेक्टर क्षेत्रावरील भातशेतीचे नुकसान झाले आहे.

## केंद्राकडून राज्याला ६,४१८ कोटी अग्रीम हस्तांतरण

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने राज्य सरकारांना कराचे अग्रीम हस्तांतरण केले असून त्यापैकी महाराष्ट्राला सहा हजार ४१८ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. हे हस्तांतरण १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सामान्य मासिक हस्तांतरणाव्यतिरिक्त आहे. या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले आहेत.

सणासुदीच्या हंगामाच्या दृष्टीने आणि राज्याला भांडवली खर्च वाढवण्यास सक्षम करण्यासाठी तसेच कल्याणकारी व विकास योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी या रकमेचा राज्याला निश्चित उपयोग होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

## कर्जतमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये तीन तरुणांचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये तीन तरुणांचा मृत्यू झाला. यामध्ये २५ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. रेल्वे अपघातात दुसऱ्या तरुणाचा मृत्यू झाला, तर तिसऱ्या घटनेत एका २७ वर्षीय तरुणाचा कामावर असताना फिट आल्याने मृत्यू झाला असल्याची चर्चा समोर आली आहे.

दसऱ्याच्या दिवशी सुट्टी एन्जॉय करण्यातही कल्याण आणि अंबरनाथ येथून १२ तरुणांचा एक ग्रुप कर्जत तालुक्यातील नेरळजवळील वाकस ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या पिकॅडली रिसॉर्टवर मौजमजा करण्यासाठी आला होता. या वेळी अंबरनाथमध्ये राहणारा २५ वर्षीय राहुल गुप्ता या तरुणाला रिसॉर्टजवळील पेज नदीत पोहण्याचा मोह झाल्याने तो पाण्यात उतरला असता पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाला. सायंकाळी ही घटना समजताच नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. खोपोली येथील हेल्प फाऊंडेशन टीमलाही मदतीसाठी बोलवण्यात आले होते, मात्र अंधार पडल्याने शोधमोहीम थांबवून शुक्रवारी (दि.३) सकाळी सुरू करण्यात आली. या तरुणाचा घटनास्थळाहून ४०० मीटर अंतरावर मृतदेह सापडला.

दुसऱ्या घटनेत शुक्रवारी सकाळी वांगणी आणि शेलू रेल्वेस्थानकांच्या मध्ये एका तरुणाचा ट्रेनखाली येऊन मृत्यू झाल्याची घटना घडली. मृत तरुणाची अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. मृतदेह नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला असून अधिक तपास कर्जत रेल्वे पोलीस करीत आहेत.

सकाळपासून दोन वेगवेगळ्या तरुणांच्या मृत्यूची माहिती समोर येत नाही तोच कर्जत पोलीस ठाणे हद्दीत तिसरी घटना घडली. कर्जत-चौक रस्त्यावर खैराट गावाच्या हद्दीत असलेल्या सॉल्ट रिसॉर्टमध्ये काम करणारा तालुक्यातील मांडवणे येथील २७ वर्षीय समीर करवंदे या आदिवासी तरुणाचा अचानक जमिनीवर पडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. सुरुवातीला साप चावला म्हणून मृत्यू झाला अशी बोंब उठली, तर रिसॉर्टच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात वेगळेच दृश्य समोर आले. या तरुणाला फिट आल्याचे सांगण्यात आले असून मृतदेह कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला होता. या तरुणाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे शवविच्छेदनानंतर समोर येईल असे डॉक्टरांनी सांगितले, मात्र मांडवणे ग्रामस्थांनी कर्जत पोलीस ठाण्यात गर्दी केली होती.

# खालापुरात खैराची तस्करी पकडली

## * सांगडे येथील जंगलात वनविभागाची कारवाई
## * कारसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी फरार

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सांगडे येथील जंगलात रात्री काही अज्ञात आरोपी हे खैरांची तस्करी करीत असताना वनविभागाने धाड टाकली असून यात एका इको गाडीसह दहा लाखांचा मुद्देमाल खालापूर वनविभागाने जप्त केला आहे.

खालापूर तालुक्यात दिवसेंदिवस खैराची तस्करी वाढत असून नुकताच चावणी येथील जंगलात धडक कारवाई करत पाच आरोपीच्या मुसक्या आवळून पीकअप गाडी वानविभागाने जप्त केली होती ही घटना ताजी असताना काल सांगडे येथील जंगलात काही अज्ञात आरोपी हे खैर झाडांची तस्करी करून ओंडके गाडीत भरत असल्याची गोपनीय माहिती वनविभागाला



मिळाली होती.

उपवनसरक्षक अलिबाग राहुल पाटील, सहाय्यक वनसंरक्षक पनवेल सागर माळी, यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर वनपरीक्षेत्र अधिकारी राजेंद्र पवार आणि त्यांच्या टीमने आपली सूत्रे वेगाने फिरवत रात्रीच्या वेळी या ठिकाणी कारवाई केली,त्यांना तेथे आरोपी हे गाडीत खैराची लाकडे गाडीत भरत असल्याचे आढळून आले, वनविभागाची धाड पडताच अंधाराचा फायदा घेत आरोपी पसार झाले तर त्या ठिकाणी इको गाडी क्रमांक (एचएच ४६ सीएम ५१९१) ही आढळून आली त्यांनी अधिक तपास केला असता गाडीत खैर लाकडाचे ४० ओंडके, पेट्रोल कटर मशीन, लोखंडी रॉड, लाकडी दांडके, मसाला मिरची पूडसह मोबाईल, कीपॅड सह वनविभागाने दहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत खालापूर वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र पवार, चिलठण तपास अधिकारी संजय पांगारे, वनपाल खोपोली भगवान दळवी, वनपाल खालापूर नितीन कांबळे, वनपाल निगडोली पांडुरंग गायकवाड, वनरक्षक अंकुश केंद्रे, सागर टोकरेकोळी, प्रथमेश देवरे, कैलास कांबळे, आदींनी महत्वाची कामागिरी बजावली. या घटनेचा अधिक पुढील तपास वनपाल चिलठन करीत आहेत.

# महाडमध्ये एसटी बसला अपघात; दोन महिला जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड फाळकेवाडी बसला ताम्हणे गावाजवळ रस्ता निसरडा असल्यामुळे रस्त्याच्या बाजूला टायर खचल्याने झालेल्या अपघातात या बसमधून प्रवास करणाऱ्या दोन महिला किरकोळ जखमी झाल्या असून त्यांना विन्हेरे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की महाड आगारातून महाड फाळकेवाडी बस (एमएच २० बीएल ३०७४) या बसला ताम्हणे गावाजवळ दुपारी तीनच्या सुमारास ताम्हणे गावावरून महाडकडे जात असताना निसरड्या रस्त्यामुळे बसचा टायर खचून झालेल्या अपघातात या बसमधून प्रवास करणाऱ्या दोन महिला किरकोळ जखमी झाल्या.



या बसमधून प्रवास करणाऱ्या महाड पंचायत समितीच्या माजी सभापती सत्यवान कदम यांच्या पत्नी व बाग अळी विन्हेरे येथील शरद नाना सकपाळ यांच्या पत्नीला दोन टाके पडले असून त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र विन्हेरे येथील रुग्णालयात उपचार करून घरी सोडून दिले आहे.

ताम्हणे गावाकडील जाणारा रस्ता हा एसटी वाहतुकीस धोकादायक झाल्याचे यावरून निष्पन्न होत असून सुदैवाने रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या बंधार्यात जर ही बस गेली असती तर मोठा अनर्थ घडला असता. या रस्त्याची जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी गावातील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# शेकाप नगरसेवकांचे जातीचे दाखले रद्द

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायतीचे शेकापचे नगरसेवक निशांत पानपाटील यांनी जातीचा खोटा दाखला दिल्याने धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने निशांत पानपाटील यांचा जातीचा दाखला रद्द केला आहे. त्यामुळे शेकापचे नेते व उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांना मोठा धक्का बसला असून, निशांत पानपाटील यांचे नगरसेवक पद रद्द करून त्यांच्यावर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख, नगरसेविका सुप्रिया साळुंखे त्यांनी केल्याचे समजते.

खालापूर नगरपंचायतीचे शेकापचे नगरसेवक आकेश जोशी यांनी जातीचा खोटा दाखला दिल्याने त्यांचे नगरसेवक पद रद्द झाले होते. जोशी यांच्या जागी बिनविरोध नगरसेवक झालेले निशांत पानपाटील यांनीही जातीचा खोटा दाखला दिल्याचे समोर आले आहे. शिवसेनेच्या (शिंदे गटाच्या) महिला जिल्हाप्रमुख आणि नगरसेविका सुप्रिया साळुंखे यांनी माहितीच्या आधिकारात ही बाब उघड केली आहे. धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने निशांत पानपाटील यांचा जातीचा दाखला रद्द केला आहे. शेकापचे नेते उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जातोय.

आकेश जोशी आणि निशांत पानपाटील यांचे जातीचे दाखले खोटे ठरले आहेत. शेकापचे गटनेते असलेल्या संतोष जंगम यांना दाखले खोटे आहेत हे माहित असूनही त्यांनी जाणीवपुर्वक खोटे दाखले जमा करून शासनाची फसवणूक केल्याने संतोष जंगम आणि निशांत पानपाटील यांच्याविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख आणि नगरसेविका सुप्रिया साळुंखे यांनी केश्रळ असे खात्रीलायक वृत्त आहे.

गैरकारभाराबाबत संचालक असलेले यशवंत साबळे यांनी रायगड पोलीस अधीक्षक अचल दलाल यांच्याकडे लेखी तक्रार दिल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्यामुळे संतोष जंगम यांच्या अडचणीत वाढ होणार अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे वरिष्ठ नेते याबाबत काय भूमिका घेतात याकडे रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जीवना बंदर जेट्टीमुळे श्रीवर्धनच्या समुद्रकिनारी परिणाम

## उपाययोजनेची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

मागील दोन वर्षांपासून श्रीवर्धन येथील जीवनाबंदर जेट्टीचे विकासाचे काम सुरू आहे. या जेटीच्या पुनर्निर्माणासाठी या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावरती दगडांचा भराव करण्यात आलेला आहे. या दगडांच्या भरावाबरोबरच त्यावरती मुरूम व मातीचा भरावदेखील करण्यात आलेला आहे, परंतु यावर्षी पावसाने जोरदार तडाखा दिल्याने व समुद्र देखील खवळलेला असल्याने या नव्याने निर्माण होत असल्याचे जेट्टीचे दुष्परिणाम परिणाम श्रीवर्धनच्या नागरिकांना दिसू लागले आहेत.

श्रीवर्धन समुद्रकिनारी गणेश विसर्जनासाठी किंवा नागरिकांना व पर्यटकांना समुद्रामध्ये उतरण्यासाठी रॅम्प बांधण्यात आलेले आहेत. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर बांधण्यात आलेले हे रॅम्प मागील काही दिवसांपासून त्या ठिकाणाची वाळू खाली खचल्याने अपुरे पडू लागले होते. त्यामुळे श्रीवर्धन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे सुशोभीकरणाचे काम हाती घेतलेल्या रविराज इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने सदर रॅम्पची लांबी वाढवून दिली होती, परंतु रॅम्पची लांबी वाढवून देत देत असताना खाली दगडाचा भराव केला होता. या भरावाला खूप खोल खणून भराव करून त्यावरती काँक्रीट टाकणे आवश्यक असताना केवळ भरावावरती स्लॅब टाकल्याने समुद्रालाटांच्या जोरदार तडाख्यामुळे सदर रॅम्प खालील दगड वाहून गेले व रॅम्प तुटून पडले.

ऐन गणेशोत्सवात सदर रॅम्पचे दुरुस्तीचे काम पाण्याच्या वाढलेल्या पातळी मुळे पूर्णपणे न झाल्याने नागरिकांना गणेश विसर्जन करण्यासाठी खूप मोठा त्रास सहन करावा लागला होता. नवीन निर्माण होत असलेल्या जीवनाबंदर जेट्टी साठी भराव केल्यामुळे श्रीवर्धन येथील अत्यंत जुनी असलेली जेटी पूर्णपणे वाळूने भरून गेली आहे. त्याचप्रमाणे खालचा जीवना परिसर हा देखील पूर्णपणे वाळूने भरून गेला आहे. त्यामुळे समुद्राला कितीही भरती आली तरी सदरच्या ठिकाणाची वाळू पाहायला मिळते. परंतु श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील मठाच्या स्मशानभूमीपासूनचा भाग पाणी पातळी वाढल्यामुळे दिवसेंदिवस खोल होऊन या ठिकाणची वाळु भरतीमुळे व जोरदार पाण्याच्या प्रभावामुळे खालचा जीवना व जुनी जेट्टी या परिसरामध्ये जमा होत आहे.

धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची लांबी अजून वाढवली गेल्यास श्रीवर्धन येथील दांडे परिसराकडे देखील पाण्याचा ओघ मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येईल. पर्यायाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व सदर नवीन जेट्टी चे काम करणाऱ्या विकासकाने या गोष्टींची जाणीव शासनाला करून द्यावी व वाढीव निधीची तरतूद करून श्रीवर्धन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंचीदेखील लवकरात लवकर वाढवावी.

# जिल्ह्यातील ११३ गावांच्या विकास आराखड्यांना मंजुरी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महात्मा गांधी जयंतीदिनी जिल्ह्यातील आदिवासी भागासाठी महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला. भारत सरकारच्या जनजाती कार्य मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'आदि कर्मयोगी अभियानांतर्गत' जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील ११३ गावांच्या ग्राम विकास आराखड्यांना विशेष ग्रामसभांमध्ये मंजुरी देण्यात आली.

या विकास आराखड्यांनुसार सन २०३० पर्यंत गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'आदि सेवा पर्व अभियान' अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. या दरम्यान आदि कर्मयोगी स्वयंसेवकांनी सर्व विभागीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने प्रत्येक आदिवासी वाड्याला भेट देत शिबिर फेऱ्या आयोजित केल्या. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण यांसंबंधी अडचणींची तपासणी करून ग्रामनिहाय माहिती संकलित करण्यात आली. या माहितीच्या आधारे संबंधित गावांचे विकास आराखडे तयार करण्यात आले.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या आदेशांन्वये जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या सर्वानुमते पुढील पाच वर्षांसाठी विकास कामांना हिरवा कंदील दाखविण्यात आला.

या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आदिवासी वाड्यांच्या विकासाला गती मिळणार असून, मूलभूत सुविधा व विकासाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे 'विकसित भारत' या संकल्पनेला चालना मिळेल.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातर्फे बुधवारी अकाउंट व फायनान्स या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन केले होते.

या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील प्रमुख वक्ते म्हणून प्रा. आनंद शेलार यांनी महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना फायनान्शिअल अकाउंटिंग विषयातील विविध संकल्पना, त्यांचे व्यवहारातील अनुप्रयोग, समस्या व त्यांच्या निराकरणांच्या पद्धती यावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच व्यवसायातील निर्णय प्रक्रियेतला खर्च नियंत्रण व नियोजन यामध्ये फायनान्शियल अकाऊंटिंग कसा उपयुक्त ठरतो याविषयी स्पष्टीकरण दिले.

या वेळी विद्यार्थी म्हणाले की, या सत्रामुळे त्यांच्या ज्या संकल्पना अस्पष्ट होत्या त्या आज स्पष्ट झाल्या आहेत. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.महेश्वरी झिरपे यांनी या व्याख्यानाचे आयोजन केल्याबद्दल कॉमर्स व अकाउंटन्सी विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख विभाग प्रमुख कॉमर्स व अकाउंटन्सी विभाग, तसेच इतर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे पूरग्रस्तांना मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी झाली. त्यांच्या आशा-स्वप्नं महापुरात वाहून गेले , तरीही शेतकरी थांबला नाही; तो पुन्हा शून्यातून नव्याने उभा राहतोय. अशावेळी त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी शक्य असेल ते सर्व सहकार्य करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन भाजप नेते आणि जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी केले होते. या वेळी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि पनवेल, उरण व खालापूरमधील नागरिक तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य जमा करून त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावण्याचा पुढाकार घेण्यात आला.



पनवेल उरण आणि खालापूर मधील विविध संस्थांनी व नागरिकांनी लहान मुलांसाठी दप्तर, वह्या, पेन्सिल, पेन, खोडरबर, शार्पनर, पट्टी यांसारखे शालेय साहित्य जमा केले. हे सर्व साहित्य दसऱ्याच्याच दिवशी वितरण करून लहान मुलांना दसऱ्याला सोनेरूपी शालेय वस्तूंची भेट द्यावी या प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या विचाराने दादांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्ह्यातील परांडे तालुक्यातील वागेगव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दसऱ्याचे सोने रूपी शालेय संच वाटप करण्यात आले. याप्रसंगी लहान मुले आपल्या हातात पुस्तकं, वह्या आणि पेन्सिल धरताना अत्यंत आनंदी दिसत होती आणि त्यांच्या डोळ्यात उत्साह व आशेची चमक स्पष्ट दिसत होती. या वेळी परंडा तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक प्रतिनिधी, पालक वर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाअंतर्गत परांडा तालुक्यातील १३८ जिल्हा परिषदेच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना पुढील आठवड्याभरात अशाच प्रकारे शालेय साहित्य वितरणाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या भागातील प्रत्येक लहान मुलाला शिक्षणासाठी आवश्यक शालेय वस्तू मिळतील.

दसऱ्याच्या दिवशीच हा उपक्रम घेऊन जेणेकरून लहान मुलं त्यांना आवश्यक ते नवीन शालेय साहित्य मिळाल्याने खुश होतील त्यांच्या चेहऱ्यावर एक हास्य उमटेल हा उद्देश श्री.प्रितम म्हात्रे यांनी समोर ठेवून पूरग्रस्त लहान भावंडांना सोने रुपी शालेय साहित्य दिले, समाजाप्रती आजही त्यांची नाळ जोडलेली आहे हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले.

पान १ वरुन

# 'आत्मनिर्भर भारत'मुळे देशाची ताकद वाढणार

आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान हे केवळ सरकारी धोरण नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेली एक सामूहिक चळवळ आहे. स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढवून, स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आणि आयातीत घट करून भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत मजबुती देण्याचा यातून प्रयत्न केला जात आहे. या अभियानामुळे ग्रामीण आणि शहरी भागात उद्योगसंधी वाढत असून रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे. देश स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, त्यामुळे प्रत्येकाने स्वदेशी वस्तूंचा वापर केला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या भाषणातून आत्मनिर्भर भारत ही काळाची गरज असल्याचे म्हटले. पक्षाकडून देण्यात आलेली जबाबदारी आपण सर्वजण यशस्वीपणे पार पाडत असल्याचे सांगून आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान यशस्वी करूया, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यशाळेला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रायगड जिल्हा सरचिटणीस व आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे जिल्हा संयोजक नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, रवी भोईर, वासुदेव घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे जिल्हा संयोजक निलेश म्हात्रे यांच्यासह विविध मंडळ अध्यक्ष, जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान साकारले आहे. या अभियानाचा उद्देश भारताला सामाजिक आणि आर्थिक आत्मनिर्भर बनवणे असून हे अभियान २५ सप्टेंबरला पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती ते २५ डिसेंबर भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदरम्यान राबवण्यात येणार आहे. हे अभियान म्हणजे लोकसहभागातून राष्ट्र शक्ती उभारण्याची चळवळ आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पनेसाठी जोडणे, प्रत्येक नागरिकाला प्रेरित करणे आणि प्रत्येक घरापर्यंत आत्मनिर्भरतेचा संदेश पोहचवणे आहे. हर घर स्वदेशी-घर घर स्वदेशी या भावनेतून या अभियानाला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आत्मनिर्भर भारत संकल्प संमेलन आणि आत्मनिर्भर संकल्प रथयात्रा यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामागचा उद्देश वोकल फॉर लोकल हा संदेश प्रत्येक भारतीयांपर्यंत पोहचवणे हा आहे, ज्यामुळे देशाची आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक ओळख अधिक बळकट होईल.

# महावितरणतर्फे 'सन्मान सौदामिनीचा'

**भांडुप : प्रतिनिधी**

महावितरण मुख्यालयाच्या नवीन संकल्पनेतून यावर्षी पहिल्यांदाच 'सन्मान सौदामिनीचा' या कार्यक्रमाला राज्यभर सुरुवात केली असुन भांडुप परिमंडलातर्फे १ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाणे नागरी मंडळ कार्यालयात करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (मासं) राजेंद्र पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भांडुप परिमंडलचे मुख्य अभियंता संजय पाटील होते. कार्यक्रमास दीपक पाटील, प्रवीण रहांगदळे, माणिक राठोड, डी. बी. पवार, सतीश जाधव, चंद्रमणी मेश्राम, नमिता गझदर, उषा गावकर आदी उपस्थित होते. या वेळी, विजेसारख्या जोखमेचा तांत्रिक क्षेत्रामध्ये महावितरणच्या माध्यमातून ज्या महिला अभियंता, अधिकारी व कर्मचारी यांनी सक्षमपणे काम करून स्वतःला सिद्ध केले आहे अशा महिलांचा सन्मान करण्यात आला. निम्नस्तर लिपिक शीतल शेलार, सहाय्यक लेखापाल प्रिया पाटील व सहाय्यक लेखापाल पुनम वाघ यांना प्रातिनिधिक स्वरूपात सन्मानित करण्यात आले.



## दुखवटा

# विलास गवळी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

एचओसी कंपनीचे माजी कर्मचारी व श्री साई बाबा सत्संग केंद्र रसायनीचे संस्थापक सदस्य (विश्वस्त) विलास नामदेव गवळी यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व तीन मुली, जावई असा परिवार आहे. विलास गवळी यांचे मोहोपाडा रसायनी येथील श्री साई मंदिरासाठी त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी खजिनदार, उपाध्यक्ष व विश्वस्त म्हणून कार्य केले आहे. ते चांगले सल्लागार होते. श्री साईबाबा सत्संग केंद्र साई परिवार गवळी परिवार यांच्या दुःखात सहभागी आहे.



## निवडक

### ९१ हजारांच्या सामानाची चोरी

**पनवेल :** हेअर ट्रीटमेंटच्या ९१ हजार रुपयांच्या बाटल्यांची चोरी केल्याप्रकरणी सलूनमध्ये हाउसकीपिंगचे काम करणारा काफील जमीर अहमद यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. काजल पटेल ह्या ऐरोली येथे राहत असून त्यांचा खारघर सेक्टर ७ येथे नमस्ते सलून नावाचे सलून आहे. त्यांच्याकडे काफील अहमद हाउसकीपिंगचे काम करतो. सलूनमध्ये हेअर ट्रीटमेंटच्या बाटल्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यांनी स्टॉकमध्ये ठेवलेल्या दोन बाटल्या दिसून आल्या नाहीत. त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता हाउसकीपिंगचे काम करणारा काफिल अहमद हा बाटल्या कचऱ्याच्या पिशवीत टाकून बाहेर घेऊन जाताना दिसला आणि नंतर कचऱ्याचे पिशवी बाहेर घेऊन जाताना दिसून आला.

### कामोठे येथे दागिन्यांची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून अकरा लाख ८१ हजार रुपये किमतीच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सविता म्हस्कर या सेक्टर ३५, कामोठे येथे राहत असून त्यांनी त्यांच्या शेजारी राहणाऱ्या महिलेला घरातील बेडरूममधील सोने काढून दाखवले होते. या वेळी अन्य एक महिला त्या ठिकाणी उपस्थित होती. त्यांनी सोन्याचे डिझाईन दाखवून परत ते बॉक्समध्ये भरून बेडमध्ये ठेवले. त्यांच्या सोसायटीमध्ये देवीची स्थापना केलेली असल्याने त्या ठिकाणी गरब्या करिता घरचा दरवाजा लोटून त्या जात होत्या. त्यांना सकाळी दागिन्यांची आवश्यकता असल्याने त्यांनी बेडमधील सोने घेण्यासाठी गेले बॉक्स काढला असता त्यात दागिने आढळून आले नाहीत. घरात शोधाशोध केली, मात्र दागिने सापडून आले नाहीत.

### सराफाच्या दुकानांमध्ये गर्दी



**उरण :** दसरा सणाला नागरिक सोने खरेदी करीत असतात. उरण बाजार पेठेतील सराफाच्या दुकानांत नागरिकांनी सोने खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. सोने कितीही महाग झाले तरी सोने खरेदी हि होतेच. महिला वर्गांनी गर्दी केली होती. हार, बांगड्या, मंगळसूत्र, कानातील रिंगा, पुरुष वर्गांनी हातातील ब्रेसलेट, चेन इत्यादी अलंकार खरेदी करतांना नागरिक दिसत होते. सोने खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली असल्याचे असर मिलन ज्वेलर्सचे नारायणशेठ यांनी सांगितले.

# पथविक्रेत्यांचा मेळावा, फेरीवाल्यांना प्रशिक्षण

## पनवेल महापालिकेमार्फत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेमार्फत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत ३० सप्टेंबर रोजी प्रभाग कार्यालय कामोठे येथे पथविक्रेत्यांकरिता लोककल्याण मेळावा आणि अन्नविक्रेता फेरीवाल्यांना प्रशिक्षण देण्यात आले.



प्रभाग कार्यालय कामोठे येथे पथ विक्रेत्यांकरिता झालेले लोक कल्याण मेळावा आणि अन्नविक्रेता फेरीवाल्यांचे प्रशिक्षण हे श्री नॅलेटिकल लॅब या एजन्सीकडून घेण्यात आले. या प्रशिक्षणाकरिता पनवेल प्रभागामधील पथविक्रेत्यांना मोठ्या संस्थेने सहभाग नोंदविला.

प्रशिक्षणामध्ये अन्नविक्रेते फेरीवाल्यांना विक्री करताना कशा प्रकारची स्वच्छता ठेवावी, स्वत:ची स्वच्छता कशी करणे, आपण विक्री करत असलेल्या जागेची स्वच्छता व जागेची निवड कशी करावी या बाबत माहिती दिली. तसेच अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण या बाबतचा परवाना मिळविण्यासाठी काय कार्यवाही करावी याबाबत माहिती सांगण्यात आली.

प्रशिक्षण कार्यक्रम उपायुक्त अभिषेक पराडकर, सहायक आयुक्त रूपाली माने व सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर यांचे सहकार्य लाभले.

### लोककल्याण मेळाव्याची उद्दिष्टे

पीएम स्वनिधी योजनेंतर्गत नवीन अर्जासाठी प्रचार प्रसिद्धी करणे. आधीच मंजूर झालेल्या अर्जाचे कर्ज वितरण सुलभ करणे. बँकेकडून ULBकडे परत केलेल्या प्रलंबित अर्ज निकाली काढणे. बँकांकडे मंजुरीसाठी प्रलंबित अर्ज निकाली काढणे. प्रलंबित लाभार्थ्यांचे डिजिटल ऑनबोर्डिंग सुनिश्चित करणे. FSSAIच्या समन्वयाने अन्न पदार्थ विक्रेत्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे. पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग करून आठ योजनांचा लाभ मिळून देणे.

## गुंतवणुकीवर नफ्याचे आमिष दाखवून ६९ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गुंतवणुकीवर पाच टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून ट्रेडिंग ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठी लिंक दिली आणि गुंतवणूक केलेली रक्कम आणि त्यावर झालेल्या नफा अशी रक्कम परत न करता ६९ लाख सात हजार ९०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पाच अनोळखी व्यक्तीविरोधात सायबर पोलीस ठाण्यात १ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पुनम म्हात्रे ह्या सुकापूर येथे राहत असून त्यांच्या पतीला टेलिग्राम ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात आले. त्या ट्रेडिंगमध्ये पाच टक्क्यांपर्यंत परतावा मिळेल असे सांगण्यात आले. त्यांना ग्रुपमध्ये लिंक पाठवून ग्रुपमध्ये समाविष्ट होण्यास सांगण्यात आले. त्या दोघांनी त्यात गुंतवणूक करण्याचे ठरवले. या वेळी त्यांनी एप्लीकेशन डाउनलोड केले आणि त्यात नोंदणी केली. त्यावेळी बनावट सर्टिफिकेट पाठवण्यात आले. त्यांनी एकूण ६९ लाख ६९ हजार रुपये भरले. जुलै २०२५ मध्ये त्यांनी काही रक्कम काढून पाहिली असता ती रक्कम बँक खात्यावर जमा झाल्याने त्यांचा विश्वास बसला. एक सप्टेंबर रोजी त्यांच्या ट्रेडिंग अकाउंटला नफ्यासह एक कोटी ८८ लाख ७३ हजार इतकी रक्कम दिसत होती.

रक्कम काढण्याकरता संपर्क केला असता सहा लाख ७० हजार रुपये व्हेरिफिकेशन डिपॉझिट भरावे लागेल असे सांगण्यात आले, मात्र त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी विनंती करूनही कोणतीही रक्कम परत केली नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने म्हात्रे यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## बेस्टमध्ये नोकरी लावतो सांगून गंडा

**पनवेल : वार्ताहर**

बेस्ट मध्ये मेंटेनन्स विभागात नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून एक लाख ७० हजार रुपये घेऊन नोकरी न लावता आणि पैसे परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी सुजय सदानंद राणे (रा. काल्हेर, ठाणे) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अक्षय कांबळे हा विचुंबे गाव येथे राहत असून त्यांच्या वडिलांच्या ओळखीचा सुजय राणे याचे त्यांच्या घरी येणे जाणे होते. त्यांनी बेस्ट मुंबई येथील साहेब ओळखीचे असून नोकरी लावण्याचे काम करून देतात असे सांगितले. या वेळी दोन लाखात नोकरी लावतो असे सांगितले. त्यानुसार कांबळे यांनी एक लाख ७० हजार रुपये त्याला दिले. नोकरीबद्दल चौकशी केली असता वेगवेगळे कारणे देऊन उडवाउडवीची उत्तरे देत होता. जूनपासून फोन उचलणेदेखील बंद केले.

या वेळी मोबाईलवर मेसेज द्वारे पैसे परत करण्याबाबत कळवले असता वैयक्तिक अडचणी सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली. भेटदेखील झाली नाही. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

## उरण येथे नशामुक्ती जनजागृती रॅली

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण पोलीस ठाणे व मोरा सागरी पोलीस ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहरामध्ये शुक्रवारी (दि. ३) नशा मुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली होती.

रॅलीत उरण एज्युकेशन सोसायटी शाळा, एन.आय.हायस्कुल व सिटीझन हायस्कूलचे विद्यार्थी तसेच हद्दीतील प्रतिष्ठित नागरीक व पोलीस पाटील सहभागी झाले होते. ही रॅली पेन्शन पार्क, (वैष्णवी हॉटेल) उरण येथून सुरू होवून स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळा मार्गाने, गणपती चौक, राजपाल नाका तेथून पालवी हॉस्पीटल मार्गाने कामठा रोडने एन.आय.हासस्कुल येथे सांगता समारोप करण्यात आला. उपस्थित विद्यार्थी व प्रतिष्ठित व्यक्तींना नशा मुक्ती संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

या जनजागृती रॅलीमध्ये शाळेचे आठ शिक्षक, ३०० विद्यार्थी ३० ते ३५ प्रतिष्ठित नागरीक व १५ पोलीस पाटील यांचेसह उरण पोलीस ठाण्याचे, तीन अधिकारी व ३५ पोलीस अंमलदार तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे एक अधिकारी व १० पोलीस अंमलदार आदी सहभागी झाले होते.




## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्रभेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागामार्फत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी (दि.३) जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन केले होते.



या शैक्षणिक भेटीचे प्रमुख उद्दिष्ट लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यावरील प्रत्यक्ष ज्ञान मिळवणे हे होते. या शैक्षणिक भेटीचे आयोजन लॉजिस्टिक्स ॲन्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमातील घटक म्हणून करण्यात आले होते. या भेटीत विद्यार्थ्यांना भारतातील एक प्रमुख व व्यस्त बंदर असलेल्या आवारा जवाहरलाल नेहरू बंदरातील कामकाजाची माहिती प्रत्यक्ष पाहता आली तसेच पोर्टवरील विविध लॉजिस्टिक प्रक्रिया, कंटेनर हँडलिंग, इम्पोर्ट-एक्सपोर्ट व्यवस्थापन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणारे माल वाहतूक व्यवस्थापन याचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना करता आला.

या शैक्षणिक भेटीमध्ये मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रा. स्नेहा नाईक व प्रा. आकांक्षा त्रिपाठी उपस्थित होत्या.

या संपूर्ण शैक्षणिक भेटीचे नियोजन व आयोजन मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रमुख डॉ. रित ठुले यांनी केले. या शैक्षणिक अभ्यासभेटीसाठी परवानगी दिल्याबद्दल प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे त्यांनी मन:पूर्वक आभार मानले. या शैक्षणिक उपक्रमासाठी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



**पनवेल : विजयादशमीच्या मंगलमय पर्वावर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजीनगर येथे पारंपरिक प्रथेप्रमाणे आपट्याच्या झाडाचे पूजन केले. या वेळी त्यांनी आपट्याचे पान देऊन उपस्थित नागरिकांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. दसऱ्याच्या दिवशी आपट्याच्या झाडाची पूजा करून सोने म्हणजे आपट्याचे पान वाटण्याची परंपरा आहे. याच परंपरेनुसार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजी नगर येथे आपट्याच्या झाडाची विधीवत पूजा केली. या वेळी भाजप नेते कृष्णाशेठ ठाकूर आणि अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.**

## सीकेटी विद्यालयात फोक डान्स स्पर्धा; विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि.३) एकेरी 'फोक डान्स 'स्पर्धेचे शालेय स्तरावर आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन व नारळ वाढवून करण्यात आले.




ह्या स्पर्धेसाठी तब्बल ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.आपल्या अप्रतीम नृत्याविष्काराने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत एकापेक्षा एक नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून नृत्याचे ज्ञान असलेल्या स्नेहल जाधव व प्रीती धाकरस यांनी अगदी काटेकोरपणे काम पाहिले आणि विजेते क्रमांक घोषित केले. सदर स्पर्धेत इयत्ता पहिली व दुसरीच्या गटातून प्रथम पारितोषिक कुमारी जीविका माने, द्वितीय रूही मोहिते व तृतीय पर्णवी पाटील हिने पटकाविला तसेच इयत्ता तिसरी व चौथीच्या गटातून प्रथम सृष्टी झुंजारराव, द्वितीय ऋतु राकेश पाटील व तृतीय अरशदीपकौर सिंग हिने पटकाविला.

दरम्यान, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विजेत्यांचे कौतुक करत उपस्थित पालकांचे आणि शिक्षकांचे विशेष आभार मानले. या वेळी त्यांनी नृत्याविषयी विषयी असलेली आपली आवड व प्रेम हे असेच कायम ठेवून त्याचा सराव नित्यनियमाने चालू ठेवावा, असे मोलाचे मार्गदर्शन केले.

या स्पर्धेची सांगता संगीत शिक्षक रुपेश मढवी यांच्या वन्दे मातरम् ह्या गीताने करण्यात आली.

या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, परीक्षक स्नेहल जाधव, प्रीती धाकरस तसेच स्पर्धाप्रमुख प्रिया नायर उपस्थित होत्या. या स्पर्धांचे आयोजन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनतीने केले.

## शेलघर गावात दसऱ्याला सोने लुटण्याची शंभर वर्षांची परंपरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शेलघर गावात सोने लुटण्याची परंपरा सुमारे शंभर वर्षांची आहे. १९२५ म्हणजेच स्वातंत्र्यपूर्वकाळापासून शेलघरमध्ये उत्साहात दसरा सण साजरा करण्याची परंपरा नारायण देहू घरत यांनी सुरू केली.

एकेकाळी शेलघरच्या जंगलातील शमीच्या (आपटा) वृक्षाखाली गावातील सर्व मंडळी एकत्र जमून सोने लुटत असत. आपल्यातील वैरभाव विसरून गुण्यागोविंदाने एक दुसऱ्याला शमीची (आपटा) पाने देऊन दसरा साजरा करत असत. त्यानंतर दसऱ्याची हीच परंपरा दिवंगत जनार्दन आत्माराम भगत, विठ्ठल गणपत भगत, तुकाराम नारायण घरत, काशिनाथ त्रिंबक भगत, जगन्नाथ वामन भगत, सुदाम कान्हा भगत यांच्या पुढाकाराने गावातील ग्रामस्थ एकत्र येत हा दसरा साजरा करीत असत.

आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत, अरुणशेठ भगत, अमृत भगत, रमेश घरत, गुलाब घरत, मधुकर म्हात्रे, श्रीकांत घरत, रतनशेठ भगत आदी मंडळींच्या मार्गदर्शनाखाली शेलघरमधील तरुण पिढी एकत्र आली आणि गुरुवारी दसऱ्याला सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन शमीच्या झाडाची पूजा केली.



## आरएसएसतर्फे खारघरमध्ये शताब्दी सोहळा उत्साहात





**खारघर : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) शताब्दी वर्षाची सुरुवात खारघर शहरातील विजयादशमी समारंभाने झाली. २११ गणवेशधारी स्वयंसेवक आणि एकूण ८५५ नागरिक उपस्थित होते. डॉ. सोमाणी प्रमुख पाहुणे होते आणि श्री. विजय वेदपाठक प्रमुख वक्ते होते.

हिंदू समाजात विजयादशमीचे शाश्वत महत्त्व आहे, कारण ती शक्ती आणि पुरुषत्वाच्या जागरणाचे प्रतीक आहे. विजयादशमी उत्सव हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परंपरेचा अविभाज्य भाग आहे, जो शिस्त, एकता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे. या वर्षी, शताब्दी वर्षाच्या सुरुवातीसह, स्वयंसेवकांसाठी आणि संपूर्ण हिंदू समुदायासाठी या उत्सवाचे विशेष महत्त्व होते.

प्रत्येक विजयादशमी उत्सवाप्रमाणे, या वर्षीदेखील शस्त्रांची पूजा, मुख्य भाषण आणि विशेष पाहुण्यांचे भाषण यासह विविध कार्यक्रम झाले. स्वयंसेवक पूर्ण गणवेशात उपस्थित होते आणि समाजातील उच्चभ्रूंनीही उत्साहाने भाग घेतला.

या महोत्सवाविषयी माहिती देताना शहर प्रभारी म्हणाले, खारघर शहर कुलाबा जिल्ह्यात येते. महोत्सवाचे आयोजन आणि सहभागींना आमंत्रित करण्यात आम्हाला समुदायाकडून प्रचंड उत्साह आणि सकारात्मक पाठिंबा मिळाला. हा उत्साह केवळ विजयादशमीपुरता मर्यादित नव्हता तर संघाच्या शताब्दी वर्षापुरताही मर्यादित होता.

प्रमुख वक्ते विजय वेदपाठक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हा उत्सव केवळ एक परंपरा नाही तर अखंड भारताच्या निर्मितीसाठी एक प्रेरणादायी क्षण आहे. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या राष्ट्रनिर्मितीच्या प्रतिज्ञेचे स्मरण करून त्यांनी स्पष्ट केले की आज देशभरात १,३२,००० संस्थात्मक सेवा प्रकल्प कार्यरत आहेत आणि लाखो स्वयंसेवक शिक्षण, सेवा, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहेत, अशी माहिती शहर प्रचार प्रमुख ललित चौधरी यांनी दिली.

## संपादकीय

# स्वागतार्ह निर्णय

नियमांची गल्लत करून दुकाने व मॉल्सना रात्रीचे वेळी खुले ठेवण्यास प्रतिबंध केला जात होता. त्याविषयी तक्रारी आल्यामुळेच राज्य सरकारने आता याविषयी सुस्पष्ट असे परिपत्रक काढले आहे. त्यामुळे आता नियमांकडे बोट दाखवून पोलिस व स्थानिक प्रशासनांना दुकानदारांची अडवणूक करता येणार नाही.

**सध्या सर्वदूर जीवनशैली अशी झाली आहे की नोकरी-व्यवसायाच्या मागे धावणाऱ्यांना रात्री उशीराच दोन घटका कुटुंबासह घालवता येतात. अशावेळी रात्रीचे जेवण आटोपल्यावर कुठे मुलाबाळांसह आइसक्रीम खाण्यासाठी बाहेर पडावे तरी चार ठिकाणी हिंडावे लागते कारण नेमके हवे ते आइसक्रीमचे दुकान बंद झालेले आढळते. कधी कधी तर आपण दुकानाच्या दारात पोहोचावे आणि पोलिसांनी येऊन दुकानदाराला दुकान बंद करण्यास भाग पाडावे असेही होते. दुकानदाराने कोरडेपणाने 'बंद करने का टाइम हो गया' असे सांगितल्यावर होणारा हिरमोड आपल्यापैकी प्रत्येकाने कधी ना कधी अनुभवलेला असेल, पण आता हा असा हिरमोड इतिहासजमा होणार आहे. कारण राज्यातील दुकाने, मॉल्स, हॉटेल्स, सिनेमागृहे यांच्यासह इतरही व्यावसायिक आस्थापना यापुढे चोविस तास म्हणजे रात्रभर सुरु ठेवता येणार आहेत. राज्य सरकारच्या उद्योग विभागाने नुकतेच या संदर्भातील सूचनांचे परिपत्रक जारी केले आहे. यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे पोलीस तसेच स्थानिक प्रशासनाला या आस्थापनांना प्रतिबंध करता येणार नाही हे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. अर्थात जिथे दारूविक्री केली जाते असे बार, परमिटरूम, देशी दारूचे बार, हुक्का पार्लर तसेच डिस्कोथेकना मात्र यातून वगळण्यात आले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. या अशा दुकानांच्या वेळात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. हे अतिशय योग्यच म्हटले पाहिजे, कारण या प्रकारची दुकाने रात्रभर सुरू राहिल्यास एकंदरच कायदा-सुव्यवस्था राखण्यासंदर्भात अडचणी निर्माण होऊ शकतात तसेच सामाजिक, कौटुंबिक मनोस्वास्थ्यावर त्याचा वाईट परिणामच अधिक होऊ शकतो. त्यामुळे या दुकानांना या निर्णयातून वगळण्यात आले हे बरेच झाले. अन्य दुकाने चोवीस तास उघडी राहणार असल्यामुळे दुकानदारांसोबतच ग्राहकांनाही सोयीचे होणार आहे. दुकाने, मॉल आदी रात्री नऊ, साडेनऊ किंवा दहाला बंद होणे अनेकदा कित्येकांसाठी अतिशय गैरसोयीचे ठरते. कामाच्या वेळांमुळे अगदी गरज असूनही अनेकदा कित्येकांना हवी ती वस्तू वेळेअभावी जाऊन खरेदी करता येत नाही. सणासुदीच्या काळात तर संध्याकाळच्या वेळी उशीरा किंवा सुटीच्या दिवशी दुकानांमध्ये व विशेषत: मॉलमध्ये ही गर्दी ओसंडते व चोखंदळपणे वस्तू निवडण्यासाठी लागला नसेल त्याहून अधिक वेळ पेमेंटच्या रांगेत उभे राहण्यात जातो हे नेहमीच दिसत आले आहे. या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेला किती चालना मिळते व रोजगारवाढही किती होते ते येत्या काळात दिसेलच. अर्थात या निर्णयाचा ताण दुकाने व मॉलमधील कर्मचाऱ्यांवर येणार नाही याचीही काळजी सरकारने घेतली आहे. राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार आठवड्यातील सर्व दिवस २४ तास आस्थापने सुरू ठेवता येणार आहेत, मात्र तेथील कर्मचाऱ्यांना चोवीस तास सलग विश्रांती मिळेल अशी साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक असणार आहे. वास्तविक सरकारने यापूर्वीच यासंदर्भातील परिपत्रक काढले होते, परंतु नियमांची गल्लत करून दुकाने व मॉल्सना रात्रीचे वेळी खुले ठेवण्यास प्रतिबंध केला जात होता. त्याविषयी तक्रारी आल्यामुळेच राज्य सरकारने आता सुस्पष्ट असे परिपत्रक काढले आहे.**

# रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन



'रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे...' या कवी विठ्ठल वाघ यांच्या काव्यपंक्तीप्रमाणे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य हे जगाच्या पाठीवरील महानतेचे प्रतिक आहे. पिढ्यान् पिढ्या शिक्षणापासून वंचित असल्याने अज्ञात, अंधकारात ठेचाळणाऱ्या व सामाजिक विषमतेच्या, जातीभेदामुळे बहुजन समाजाचे अपमानित जिणे नष्ट करून त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण नी क्षण आणि देहाचा कण नी कण चंदनाप्रमाणे झिजविला.

अशा भाग्यविधात्यांमध्ये ज्ञानोपासक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव उच्च ठिकाणी कोरले गेले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचे तेराव्या शतकात महाराष्ट्रावर जेवढे उपकार आहेत तेवढेच या ज्ञानवंत कर्मवीर भाऊरावांचे विसाव्या शतकात महाराष्ट्रावर आहेत. अशा या महामानवाच्या विचारांचा आणि कृतीचा वारसा जोपासण्याचे काम रयत शिक्षण संस्था गेली साडे दहा दशके अखंडपणे करीत आहे. २२ सप्टेंबर १८८७ या शुभदिनी भाऊराव पायगोंडा पाटील या देवदूताचा जन्म झाला.

***सर्वसामान्य जनतेला***
***दिला जगण्याचा आधार,***
***स्थापून रयत शिक्षण संस्था***
***केला बहुजनाचा उद्धार***

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून सामाजिक, शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेऊन कर्मवीरांनी महाराष्ट्रात एक शैक्षणिक चळवळ उभी केली. बहुजन समाज तसेच सर्वसामान्य मुलांना शिक्षणाची कवाडे खुली केली. वसतिगृहयुक्त शिक्षणाची व्यवस्था करून अठरापगड जातींच्या मुलांना नवा मंत्र दिला. देशाभिमान, देशकल्याण, देशभक्ती यासाठी एका समर्पित साधूत्वाचा जन्म होता तो, आपल्या देशबांधवांना सुसंस्कृत, कार्यक्षम, स्वाभिमानी, स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी कमवा आणि शिका ही योजना राबविली. संस्थेच्या उभारणीत त्यांच्या धर्मपत्नी लक्ष्मीबाई पाटील यांचाही मोलाचा वाटा आहे.

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था ही निव्वळ शिक्षण देणारी संस्था उभी केली असे नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची एक प्रयोगशाळाच उभी केली. कराडजवळील काले या ठिकाणी सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. महाराष्ट्रातील सर्व भागातील प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. ही परिषद ४ ऑक्टोंबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मूहुर्तावर घेतली गेली. पुण्याचे वकील केशवराव बागडे अध्यक्षस्थानी होते. भाऊराव बोलण्यास उठले. केवळ भाषणाने आणि परिषदांनी आपला बहुजन समान सुधारेल असे मला वाटत नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. सूचना सर्व परिषदेत पसंत पडली, सर्वांनी मान्य केली. भाऊरावांनी त्या शिक्षण संस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव दिले. स्वतः कष्ट करून शेती पिकविणाऱ्या कष्टकऱ्याला रयत म्हणत. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रिय प्रजेला रयत म्हणत. त्या दिवसापासून काले या ठिकाणी वसतिगृह सुरू करून एक विद्यार्थी घेऊन रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला प्रत्यक्षात सुरवात केली. आज रयत शिक्षण संस्थेचा १०६वा वर्धापन दिन.

*शेतकरी, गरीब सामान्य जनतेसाठी*
***ज्ञानदीप लावला,***
***'रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेने***
***इतिहास घडविला***

कर्मवीरांनी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा विचार पोहचविला. महाराष्ट्रातील १५ व कर्नाटक राज्यातील एक अशा १६ जिल्ह्यात आज संस्थेचा कार्यविस्तार आहे. आजच्या जागतिकिकरणाच्या कालखंडात कर्मवीरांची विचारधारा अबाधित ठेवून संस्थेने आपल्या शैक्षणिक धोरणात सातत्याने सकारात्मक बदल केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांच्या दूरदृष्टीतून विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी अत्यंत महत्वाचे उपक्रम सुरू केले आहेत. संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तंत्रज्ञान, रयत ऑल्पियाड, गुरुकुल प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान, रयत विज्ञान परिषद, इनोव्हेशन, इन्वहेशन आणि इन्क्यूबेशन सेंटर, अटल ट्रिकरिंगलॅब, डिजिटल बोर्ड तसेच विविध स्पर्धा मार्गदर्शन केले जाते. आशिया खंडातील सर्वात मोठी व अग्रगण्य संस्था म्हणून मानली जाते. या संस्थेत साधारण लावलेल्या रोपट्याचे रुपांतर आज विशाल वटवृक्षात झाले आहे. भाऊराव गेले, पण हा गाभारा सरस्वतीच्या मंगल स्तोत्रांनी आणि मत्रांनी घुमत आहे. तो चंद्र आणि सूर्य असेपर्यंत घुमतच राहणार आहे.

**-एच.एन. पाटील,**
**उपशिक्षक, तु.ह. वाजेकर विद्यालय फुंडे, उरण**

# आज जागतिक प्राणी दिन

जागतिक प्राणी दिन ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जात आहे. हा एक दिवस आहे, ज्यामध्ये जगभरातील देश प्राण्यांच्या कल्याणासाठी आणि हक्कांसाठी काम करतात.

प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार रोखण्यासाठी आणि प्राण्यांच्या कल्याणाची आणि अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ४ ऑक्टोबरला जागतिक प्राणी कल्याण दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो.

जागतिक प्राणी दिन प्रथम ४ ऑक्टोबर १९२९ रोजी साजरा करण्यात आला, ज्याची सुरुवात जर्मन लेखक आणि प्रकाशक हेनरिक झिमरमन यांनी प्राणी कल्याणाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी केली. २४ मार्च १९२५ रोजी जागतिक प्राणी दिनाचे आयोजन हेनरिक झिमरमन (१८८७-१९४२) नावाच्या जर्मनने केले होते. ते केवळ लेखकच नव्हते, तर त्यांनी मेन्श अंड हुंड (माणूस आणि कुत्रा) नावाचे द्वैमासिक मासिकदेखील प्रकाशित केले. या मासिकाचा उपयोग प्राणी कल्याणाविषयीच्या त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी एक माध्यम म्हणून केला आणि जागतिक प्राणी दिन समितीची स्थापना करण्यासाठी त्याचा वापर केला.

२४ मार्च १९२५ रोजी त्यांच्या समितीने जागतिक प्राणी कल्याण दिनाचे आयोजन केले होते, त्यांनी बर्लिन (जर्मनी) येथील स्पोर्ट्स पॅलेस येथे त्यावेळच्या प्राणी कल्याणाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्याचे आयोजन केले होते आणि या पहिल्या कार्यक्रमात सुमारे ५,००० लोक उपस्थित होते आणि हा कार्यक्रम असिसीच्या सेंट फ्रान्सिसच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित होता, जो ऑक्टोबर ४ होता. अखेर हा जागतिक प्राणी दिवस म्हणून साजरा करण्याचा ठराव मे १९३१मध्ये फ्लोरेन्स इटलीतील आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसेने स्वीकारला. त्यानंतर जगभरात प्राण्यांच्या कल्याणासाठी जागतिक प्राणी दिन साजरा केला जातो.

'सर्व सृष्टीवर प्रेम करा' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे, परंतु गेल्या काही दशकांत आपण त्यापासून दूर जाऊ लागलो आहोत आणि हे पूर्णपणे चुकीचे आहे. फक्त आपल्याकडेच नाही; तर जगात अनेक ठिकाणी (सर्व प्रकारच्या) प्राणीमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच केले जाते. ही परिस्थिती बदलून सजीवांबद्दलची ममता व्यक्त करण्यासाठी हा दिवस जगभर साजरा केला जातो.

काही पाळीव प्राण्यांना आपण अतिशय चांगले वागवतो तर काहींना दिवसभरात खायलाही मिळत नाही ही समस्या सोडविण्यासाठी विविध कार्यक्रम जगभरात आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव, भटक्या अशा सर्व प्राणीमात्रांचा यामध्ये समावेश होतो.

मुक्या पशुपक्ष्यांची भाषाही आपल्याला समजत नसल्याने त्यांच्या समस्यांत भरच पडते. याविरुद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर सामुदायिक आवाज उठवण्याचे आणि काही कृती करण्याचे महत्त्व 'वर्ल्ड ॲनिमल डे' ला सांगितले जाते. या निमित्ताने आपण प्राण्यांपासून बनवलेल्या वस्तू (हस्तदंती मूर्ती, कातडी बॅग्ज, वा पर्सेस इ.) खरेदी न करण्याचे ठरवून पशुपक्ष्यांना मिळणाऱ्या क्रूर वागणुकीस अटकाव करावा. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# 'क्वांटम कम्प्युटिंग'चे धडे आता मराठीतून शक्य

राष्ट्रीय शिक्षण धोरणात प्रादेशिक भाषांतून शिक्षणावर भर देण्यात आला असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे क्वांटम कम्प्युटिंग या विषयावरील मराठी भाषेतील पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. क्वाटंम कम्प्युटिंग क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत, संशोधन करत असलेले प्रा. प्रमोद जोग यांनी या पुस्तकाचे लेखन केले असून या विषयावरील शास्त्रीय स्वरूपाचे पुस्तक मराठीतून पहिल्यांदाच उपलब्ध होणार आहे.



प्रा. जोग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात ३३ वर्षे अध्यापन करून निवृत्त झाले आहेत. क्वांटम कम्प्युटिंग या विषयावर त्यांचे अनेक शोधनिबंध, लेख प्रसिद्ध झाले आहेत तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थ्यांनी पीएचडीही प्राप्त केली आहे. क्वांटम कम्प्युटिंगसारख्या विषयावर मराठीत शास्त्रीय माहिती उपलब्ध नसल्याने त्यांनी पुस्तकाचे लेखन करण्याचा निर्णय घेतला. सध्या क्वांटम कम्प्युटिंग या विषयावर जगभरात मोठ्या प्रमाणात संशोधन होत असताना मराठीत उपलब्ध होणारे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.

पुस्तकाविषयी माहिती देताना प्रा. जोग म्हणाले, अनेक वर्षे बंगाली, तमीळ, केरळी लोकांबरोबर काम केले. विज्ञानाच्या प्रचारप्रसारात ते पुढे असल्याचे जाणवले. शाळा, महाविद्यालयांत व्याख्यान देण्यापासून वेगवेगळ्या प्रकारचे काम त्यांच्याकडून होते. त्या तुलनेत मराठीत वातावरण दिसून आले नाही. त्यामुळे मराठीत शास्त्रीय पद्धतीने पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

क्वांटम कम्प्युटिंगच्या क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून काम करत आहे. आतापर्यंत दोन पुस्तके इंग्रजीत प्रकाशित झाली आहेत. त्यामुळे आता क्वांटम कम्प्युटिंगवर मराठीत पुस्तक लिहिण्याचा विचार केला.

मराठीत वैज्ञानिक परिभाषा अद्याप परिपूर्ण नाही. त्यामुळे अतिशय सोप्या पद्धतीने मराठीत, इंग्रजी संकल्पनांचा वापर करून क्वांटम कम्प्युटिंग या विषयाची सविस्तर मांडणी केली आहे. प्रामुख्याने गणितीय आणि सैद्धांतिक संकल्पना टाळून या विषयाच्या मूळ गाभ्यातील संकल्पना समजावण्यावर भर दिला आहे. त्यातून क्वांटम कम्प्युटिंग या क्षेत्राची माहिती समजू शकेल. या विषयावर इंग्रजीत खूप पुस्तके असली, तरी शास्त्रीय पद्धतीचे पुस्तक मराठीत पाहण्यात आलेले नाही. पहिल्यांदा मराठीत पुस्तक लिहिल्यानंतर त्याचे इंग्रजीत भाषांतर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, त्यासाठी चॅटजीपीटीचे साहाय्य घेण्यात आले.

# मातब्बर अभिनेते अरुण सरनाईक



## निमित्त

अरुण शंकरराव सरनाईक हे मराठी चित्रपट-अभिनेते होते. त्यांचा जन्म ४ ऑक्टोबर १९३५ रोजी झाला. अरुण यांच्या घरातच कला होती. त्यांचे वडील शंकरराव सरनाईक हे संगीतज्ज्ञ होते, तर त्यांचे काका निवृत्तीबुवा सरनाईक हे प्रख्यात शास्त्रीय गायक होते. गाण्याचे हे अंग त्यांना या जोडीकडूनच मिळाले. त्यामुळे अभिनयात नावारूपास येण्यापूर्वीच त्यांनी पेटी, तबल्यात मातब्बरी मिळवली होती. संगीताची हीच आवड त्यांना कलाक्षेत्रातील दारे उघडण्यास उपयोगी ठरली.

तत्पूर्वी मुंबईच्या रुईया महाविद्यालयामधून त्यांनी पदवीही मिळवली. त्यानंतर लेखक-दिग्दर्शक अनंत माने यांनी 'शाहीर परशुराम' चित्रपटात अरुण यांना एक दुय्यम भूमिका दिली. या भूमिकेपाठोपाठ लेखक-दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचा वरदक्षिणा आणि दत्ता धर्माधिकारी यांचा 'विठू माझा लेकुरवाळा' हा चित्रपटही अरुण यांना मिळाला. त्यानंतर आलेल्या 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाने किमया केली आणि अरुण यांचा अरुणोदय झाला. त्यांनी भूमिका साकारलेले 'रंगल्या रात्री अशा', 'एक गाव बारा भानगडी', 'मुंबईचा जावई', 'केला इशारा जाता जाता', 'सवाल माझा ऐका' , 'सिंहासन' इत्यादी चित्रपट विशेष गाजले. १ सप्टेंबर १९६४ रोजी 'अपराध मीच केला' हे नाटक रंगमंचावर आले होते.


या नाटकातील कमांडर अशोक वर्टी ही व्यक्तिरेखा खूप गाजली होती. त्यावेळी ही भूमिका अरुण सरनाईक यांनी साकारली होती. त्यांच्यासोबत या नाटकात राजा नेने, शरद तळवलकर, वसंत ठेंगडी, कामिनी कदम हे कलाकारदेखील होते. राजा ठाकूर दिग्दर्शित 'पाहू रे किती वाट' या चित्रपटात ते डॉ. चारुदत्त या नायकाच्या व्यक्तिरेखेत झळकले तर 'सुभद्राहरण' या चित्रपटात त्यांनी थेट दुर्योधनाचा खलनायक साकारला. 'सवाल माझा ऐका'मधील त्यांचा ढोलकीवाला जयवंत आजही रसिकांच्या लक्षात आहे. असाच ढोलकीवाला त्यांनी 'केला इशारा जाता जाता' या चित्रपटातही साकारला होता.

लेखक अरुण साधू यांच्या 'सिंहासन' कादंबरीवर आधारित चित्रपटाची निर्मिती जब्बार पटेल यांनी केली. चित्रपटात सत्तेच्या राजकारणाचे अनेक पैलू बारकाव्याने टिपले आहेत. यात अरुण सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांची साकारलेली व्यक्तिरेखा ही त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वोच्च ठरली! दिनकर पाटील यांचा 'वरदक्षिणा' (१९६२) सारखे सामाजिक, अनंत मानेंचा 'एक गाव बारा भानगडी' (१९६८), 'गणाने घुंगरू हरवले' (१९७०) सारखे ग्रामीण तर 'घरकुल' (१९७०) सारखे शहरी चित्रपटांतील त्यांच्या भूमिका वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या! गायक घराण्यातून आल्याने त्यांनी काही चित्रपटांतून गाणीही गायली.

अभिनयातील व्यस्तता एकीकडे कायम ठेवत सरनाईकांनी आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेला छेद दिला नाही. चित्रीकरणातून वेळ मिळाला की कुष्ठरुग्णांसाठी काम करणाऱ्या 'आनंदग्राम'मध्ये ते स्वतःला झोकून द्यायचे. तिथे खर्या अर्थाने ते रमले. तिथल्या आबालवृद्धांच्या हाती फळे, खाऊ देताना त्यांच्या चेहर्यावरून आनंद ओसंडून वाहायचा. अशा या महान अभिनेत्याचे २१ जून १९८४ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# गॅस, ॲसिडीटी सतावते? 'या' गोष्टी करा...

सध्याची बदललेली लाईफस्टाईल आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे पोटात गॅस, ॲसिडीटी होणे या फारच कॉमन समस्या झाल्या आहेत. गॅस झाल्यावर फक्त पोटात दुखणे, जळजळ होणे किंवा ढेकर येणे इतकाच त्रास होत नाही, तर रात्री शांत झोप लागणेदेखील कठीण होऊन जाते. झोपण्यापूर्वी काही गोष्टी केल्यास गॅसचा त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते.



डोकं थोडं उंचावर ठेवून झोपा :- रात्रीच्या वेळी गॅस आणि सिडिटीच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी झोपताना डोक्याकडील भाग थोडा उंचावर ठेवणे खूप फायदेशीर ठरते. असे केल्याने गॅस, सिडिटी, छातीत जळजळ, सिड रिफ्लक्स अशा समस्यांचा त्रास कमी होतो. डोक्याकडील भाग उंच ठेवल्यामुळे गुरुत्वाकर्षणाच्या नियमांनुसार पोटातील सिड आणि गॅस अन्ननलिकेकडे परत येणे थांबते. यामुळे छातीत होणारी जळजळ कमी होते आणि शांत झोप लागते.

वॉकिंग करणे :- रात्रीचे जेवण झाल्यानंतर लगेच झोपू नका. जेवणानंतर सुमारे १५ ते २० मिनिटे फेरफटका मारल्यास पचनक्रिया गतिमान होते आणि पोटात गॅस साचून राहण्याची शक्यता कमी होते.

रात्री हलका आहार घ्यावा :- रात्रीच्या वेळी हलका आहार घ्या आणि झोपण्यापूर्वी २ ते ३ तास आधी जेवण पूर्ण करा. हलका आहार सहजपणे आणि जलद पचतो. यामुळे पचन प्रक्रिया सुधारते. परिणामी गॅस आणि अपचन यांसारख्या समस्यांपासून बचाव करण्यास मदत मिळते. रात्री पचनास जड, तळलेले किंवा मसालेदार पदार्थ खाल्ल्यास पोटावर ताण येतो. त्याऐवजी, साधे, कमी तेलकट आणि लवकर पचणारे अन्नपदार्थ खाणे पोटातील गॅसची समस्या टाळण्यासाठी सर्वोत्तम आहे.

पोटावर झोपणे टाळा :- रात्री जास्त जेवण केल्यानंतर आणि विशेषतः पोटावर झोपणे कटाक्षाने टाळले पाहिजे. पोटावर झोपल्याने पोटावर अनावश्यक दाब पडतो. या दाबामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि सिड रिफ्लक्स यांसारख्या पचनाशी संबंधित समस्या वाढू शकतात. म्हणून डाव्या कुशीवर झोपणे अधिक फायद्याचे ठरेल.

जेवण आणि झोपेत अंतर :- झोपण्यापूर्वी कमीतकमी दोन ते तीन तास आधी जेवण करावे. यामुळे पोटाला अन्न पचवण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो आणि छातीत जळजळीचा त्रास कमी होतो.

# भरडखोल-दिवेआगर रस्त्यावर खड्डे

## पर्यटनक्षेत्र श्रीवर्धनकडे जाणारे पर्यटक, प्रवासी त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेले श्रीवर्धन हे पर्यटन नगरी म्हणून सर्वत्र परिचित आहे. पर्यटनाचे माहेरघर, म्हणून ख्याती मिळालेल्या या तालुक्यात देशविदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात. श्रीवर्धन शहरापासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावर दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे हरिहरेश्वर तीर्थक्षेत्र, तर पश्चिमेला १४ किलोमीटरवर दिवेआगर सुवर्ण गणेश मंदिर ही दोन महत्त्वाची तीर्थक्षेत्रे आहेत.

दुर्दैवाने या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून प्रवासी व पर्यटकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत: भरडखोल-दिवेआगर मार्गावरील रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी पोखरला गेला आहे. रस्त्यावर इतके खड्डे आहेत की, रस्ता आहे की खड्डे याचा फरकच ओळखता येत नाही. या मार्गावरून प्रवास करताना




पर्यटकांना होडीत बसल्यासारखी हलकल्लोळाची अनुभूती येते.

फक्त प्रवाशांनाच नव्हे तर वाहनचालकांनाही या खड्डेमय रस्त्यामुळे प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. गाड्यांच्या देखभालीचे खर्च वाढले असून, अनेक वाहनधारक श्रीवर्धनला यायचे, पण रस्त्यांच्या भयानक स्थितीमुळे नकोसे होते अशा भावना व्यक्त करत आहेत.

पर्यटन हंगाम सुरू झाल्यानंतर दररोज हजारो पर्यटक या भागात येतात. अशा वेळी रस्त्यांची दयनीय अवस्था जिल्हा प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित खात्याच्या निष्काळजीपणाकडे बोट दाखवते. या मार्गाचे तातडीने दुरुस्तीकरण करून प्रवासी, पर्यटक व वाहनचालकांना दिलासा देणे अत्यंत आवश्यक आहे.

### दुरुस्तीची मागणी

**प्रवासी, पर्यटक व स्थानिक नागरिक यांची ठाम मागणी आहे की, प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन रस्ता दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे. अन्यथा उद्भवणाऱ्या अपघातांना व पर्यटनावरील परिणामाला थेट प्रशासन जबाबदार असेल.**

# तळेगाव शाळेच्या विकासासाठी कटिबद्ध -डॉ. संदीपान सानप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी डॉ. संदिपान सानप यांनी तळेगाव रा.जि.प. शाळेचा विकास व चालू बांधकामासंदर्भात उपस्थित राहुन भेट दिली. त्यांनी शाळेचे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्याशी संवाद व चर्चा करून लवकरच व ताबतोब चालू बांधकामासमोर मैदानाचे भराव काम करून दोन टॉयलेट बांधून देणार असल्याचे सांगितले. तसेच शाळेसाठी चार कॉम्प्युटर कोटॅक महिंद्रा बॅकेच्या सी.एस.आर. फंडमधुन येत्या आठ दिवसांत देऊन भविष्यातील शाळेच्या वाढीव बांधकाम खोलीसाठी पोस्को कंपनीकडून सीएसआर फंडमधुन एक खोली मंजूर करणार व पीएमश्री विकास निधीतून शाळेचा विविध सर्वांगीण विकास काम करणार असल्याचे सांगितले.

मी यापुढे दर महीन्याला शाळेला भेट देणार व पुढील एक वर्षांत शाळेच्या सर्वांगीण



विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची त्यांनी ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आपल्या शाळेच्या विकास कामात मोलाचा वाटा असणाऱ्या तसेच शाळेतुन ११ वर्षानंतर बदली झालेल्या आदर्श शिक्षिका तथा मुख्यापिका अरुणा भांडविलकर यांचा निरोप समारंभ कार्यक्रम, शाळेसाठी तळमळीने पुढाकार घेणारे माजी शिक्षक तथा मुख्याध्यापक संतोष नागे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सोबत खास नवरात्रोत्सवा निमित्ताने माणगांवच्या समाजसेविका सुवर्णा जाधव यांच्या सहकार्यातून गावातील कर्तुत्ववान ७ महिलांचा सन्मान, शाळेतील पालक(महिला) यांना मोफत साडी वाटप कार्यक्रम विद्यार्थी, पालक, महिलावर्ग, तळेगांवचे मंडळ अधिकारी श्री. पाटील, तलाठी सौ. सतेरे तसेच प्रमुख पाहुणे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेंद्र वाघमारे, पी.एम.श्री. शाळा तळेगांव तर्फे गोरेगांव शाळा बांधकाम समिती अध्यक्ष डॉ.अजय मोरे, माजी सरपंच निलेश म्हात्रे, सदस्य वैभव मोरे, गावचे नागरीक विजय वाघमारे, शिक्षण प्रेमी राजेश वाघमारे, प्रदीप माठल, जेष्ठ नागरीक नथुराम जयराम माठल, साऊंड व मंडप व्यवस्थापक नथुराम माठल, तुकाराम धामणे, संजय कदम तसेच गावातील इतर ग्रामस्थ व महिला मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा झाला.

# धामणसई धनगरवाडा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार, भाजप महाराष्ट्र राज्य प्रवक्ते आणि बहुजनांचे नेते गोपीचंद पडळकर यांच्या वाढदिवसानिमित्त, सेवा पंधरवडा उपक्रमाअंतर्गत भारतीय जनता पार्टी रोहा तालुका व भाजप युवा मोर्चा, लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग आणि राजमुद्रा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने धामणसई धनगरवाडा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात एकूण ८४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामधून ९ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले असून त्यांच्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. तर चष्म्याची आवश्यकता असणाऱ्या



रुग्णांना नि:शुल्क चष्म्यांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तर या उपक्रमासाठी भारतीय जनता पक्ष रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. भाजप युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष नरेश सुरेश कोकरे यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

कार्यक्रमाला भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, भाजयुमो तालुका अध्यक्ष नरेश कोकरे, भाजयुमो सरचिटणीस दक्षिण रायगड रोशन चाफेकर, भाजप सरचिटणीस कृष्णा बामणे, रोहा शहर अध्यक्ष सुमित रिजकुंड, भाजयुमो उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, ऋषिकेश माने, भाजप शहर सचिव सुदर्शन आमले, ग्रामस्थ मंगेश कोकळे आदी नागरिक उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीसोबत लैंगिक चाळे करणाऱ्यावर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात गुरुवारी (दि.२) एका १० वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अश्लील लैंगिक चाळे करून अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या घटनेने संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.




पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील एका वाडीमध्ये सुतारकामासाठी गेलेल्या नराधमाने मुलीची आई-वडील घरात नसल्याचे पाहून एकटी असल्याचा गैरफायदा घेत तिच्यासोबत अश्लील लैंगिक चाळे करीत लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. यासोबतच, या घटनेबद्दल कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही त्याने या अल्पवयीन मुलीला दिली. या प्रकरणी आरोपी सचिन पांडुरंग सुतार (वय ३७ रा. कुंभारकोंड महाड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३२(ख), ३३२(क), ३५१(३) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम ४, ६, ८, १० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पुढील तपास पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक एस.के. मुंढे आणि पोलीस कर्मचारी करत आहेत.


वादीचे वकिल ॲड. आर. बी. कोसमकर

**जाहिर नोटीस**

**अलिबाग येथील मे. सहकार न्यायाधिश सो., यांचे न्यायालयांत. जि. रायगड.**

दावा नं. १६/२०२३.

पनवेल इंडस्ट्रीयल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लिमिटेड, पनवेल — वादी

विरुध्द

श्री. राजिनकुमार नारायण — प्रतिवादी

प्रति,

**श्री. राजिनकुमार नारायण**
रा. प्लॉट नं.८५, पनवेल इंडस्ट्रीयल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लि., मुंबई-पुणे हायवे, मु.पो.ता. पनवेल, जिल्हा - रायगड.
यांसी,

वादी यांनी मा. सहकार न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात दावा नं. १६/२०२३ हा दावा न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे काम वर नमुद प्रतिवादी यांना सदर दाव्याच्याकामी हजर होण्यासाठी या न्यायालयाने नोटीस काढली असता नोटीसची बजावणी अदयाप होत नाही म्हणून मे. न्यायालयाने निशाणी ७ वरील आदेशानुसार नोटीसची बजावणी ''रामप्रहर'' रायगड आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीसद्वारे प्रसिध्द करण्याची परवानगी दिलेली आहे.

तरी या नोटीसव्दारे सदर वर उल्लेख प्रतिवादी यांना असे कळविण्यात येते की ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आपण स्वतः अगर वकिलांमार्फत दिनांक १४/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वर नमूद मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. आपण गैरहजर राहील्यास आपल्याविरुध्द एकतर्फी हुकूम होईल व या अर्जाचे कामकाज पुढे चालू राहील.

सदरची जाहिर नोटीस आज दि.३/१०/२०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**कोर्टाचा पत्ताः सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा. जि. प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राम्हण आळी, अलिबाग एस.टी.स्टँड समोर, मु. पो. ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१**

शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय,**
**मु. अलिबाग रायगड व रत्नागिरी जिल्हा**


# खालापूर पोलिसांतर्फे माहिती अधिकार दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी खालापूर पोलीस ठाण्यात माहिती अधिकार दिन माहिती अधिकार कार्यकर्ते यांच्या सह साजरा केला.

माहितीचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणांकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती नागरिकांना मिळवण्याचा हक्क आहे. हा हक्क माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत असून देशात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी लागू करण्यात आला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालये आणि संस्थांमधील नोंदी, कागदपत्रे आणि इतर माहिती मिळवणे शक्य झाले आहे, अशी माहिती माहिती अधिकारी कार्यकर्ते सुरेश गावडे यांनी दिली.

सरकारी कार्यालये, सार्वजनिक बँका, खाजगी संस्था ज्यांना सार्वजनिक अधिकार आहेत, अशा सर्व संस्थांच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती या कायद्यात समाविष्ट आहे. कायदा शासनाच्या कामकाजात



पारदर्शकता आणतो आणि अधिकाऱ्यांना अधिक जबाबदार बनवतो.


नागरिकांना माहिती मिळवण्याचा अधिकार आहे आणि या अधिकाराचा वापर करून ते सरकारचे कामकाज तपासू शकतात. अशीही माहिती देण्यात आली. माहिती मिळवण्यामुळे नागरिक अधिक जागरूक आणि सक्षम होतात, ज्यामुळे ते आपल्या हक्कांसाठी आवाज उठवू शकतात, असे परशुराम मी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले.उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल, ॲड.मालकर, एकनाथ पिंगळे यांनी ही मार्गदर्शन केले.

# साबाई मंदिरात सोने लुटण्याची परंपरा

**खोपोली : प्रतिनिधी**

ब्रिटिशकाळापासून सुरू असलेली सोन लुटीची परंपरा खालापूर ग्रामस्थ, तरुण पिढीने अद्याप जपली असून दसऱ्याच्या दिवशी मंदिराच्या प्रांगणात सोन लुटीचा कार्यक्रम जल्लोषात पार पडला.

यंदा पूजनाचा मान तहसीलदारांच्या अनुपस्थितीत मंडल अधिकारी संदेश पानसरे यांना मिळाला. मंदिराचे पुजारी राजू देसाई यांच्या समवेत रचून ठेवलेल्या आपट्याच्या फांद्याना प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर सोन लुटण्याचा कार्यक्रम पार पडला. लुटलेले सोने देवी साबाईला अर्पण केल्यानंतर गावकरी एकमेकांना सोन देतात. नवरात्र उत्सव विविध धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी अध्यक्ष वासुदेव मेढेकर, उपाध्यक्ष पुंडलिक लोते, खजिनदार नंदकुमार भोसले, सहखजिनदार गुरुदत्त पाष्टे, सचिव दत्तात्रय चाळके, दीपक जगताप, सौरभ भोसले यांनी परिश्रम घेतले.



# मांडला बसस्थानक नव्याने बांधण्याची मागणी

**रेवदंडा :** साळाव-मुरूड रस्तावर मांडला येथील बसस्थानक नव्याने बांधणी करावी, अशी मागणी मांडला ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांचेकडे केली आहे.

मांडला ग्रामपंचायतीचे एस.टी. स्टँड कमिटी स्थापन करण्यात आली असून त्या कमिटीचे अध्यक्ष अनिस सुलतान तांडेल, यांचेसमवेत सरपंच ऋतिक नागोटकर व उपसरपंच प्रफुल्ल भालचंद्र पालवणकर यांनी आमदार महेंद्र दळवी यांची अलिबाग-राजमळा येथील कार्यालयात भेट घेतली व मांडला एस.टी. बसस्थानकांच्या नव्याने बांधकामाची मागणीचे पत्र दिले. गेले २५ वर्षे मांडला बस स्थानक नव्याने बांधण्याची मागणी होत असून मांडला ग्रामपंचायतीत बसस्थानक नव्याने बांधण्यासाठी कमिटी स्थापन करण्यात आली आहे. अखेर आमदार महेंद्र दळवी यांना मांडला ग्रामस्थांचे वतीने एसटी बसस्थानक नव्याने बांधण्यासाठी साकडे घालण्यात आले आहे.


**तिर्थराज गृहनिर्माण सहकारी सोसायटी**
प्लॉट क्र. ३, सेक्टर-०९ पी.एल. ५/बी, इमारत क्र. १ ते २०, खांदा कॉलनी, न्यु पनवेल, ४१०२०६.

**निविदा सूचना**

**पुर्नविकास प्रकल्पासाठी व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणूक**

तिर्थराज गृहनिर्माण सहकारी सोसायटीमध्ये एकूण ३२० सभासद व ११६२०.३२ चौ. मी. क्षेत्र आहे. या सोसायटीच्या पुर्नविकासासाठी सर्वसमावेशक सेवा देण्यासाठी नामांकित व अनुभवी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) कडून निविदा मागवण्यात येत आहेत.

पात्रता: पनवेल महानगरपालिका, नवी मुंबई, ठाणे किंवा मुंबई येथील पुर्नविकास प्रकल्पामध्ये किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

निविदा शुल्क : रु. २५,०००/- (विनापरतावा) डीडी TIRTHRAJ SAHAKARI GRAHNIRMAN SANSTHA LTD च्या नावे किंवा बँक ऑफ इंडिया शाखा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम)

खाते क्रमांक : 124410210000033 या खात्यावर जमा करावेत.

IFSC : BKID0001244 या खात्यावर जमा करावेत.

को-या निविदा सोसायटी कार्यालयात दि. ०५/१०/२०२५ ते २०/१०/२०२५ पर्यंत सायंकाळी ०७.३० ते सायंकाळी ०८.३० या वेळेत मिळतील.

निविदा सादर करण्याची शेवटची तारीख २५/१०/२०२५, रात्री ८.०० वाजेपर्यंत राहील.

ठिकाण : तिर्थराज सोसायटीचे कार्यालय

महत्वाच्या सुचनाप्रस्तावाची कोणतीही किंवा सर्व विनंती कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सोसायटीकडे राहील.

अधिक माहितीसाठी किंवा शंका निवारण्यासाठी सोसायटीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सचिव,
तिर्थराज गृहनिर्माण सहकारी सोसायटी
संपर्क: ८७७९४३४३८९/९८३३४४०४८६ | Email : anuraj@mes.ac.in



**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा**
(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-400704

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष 2025-26 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **भौतिक विज्ञान, इतिहास**/(Physics, History) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained Graduate Teachers) **संस्कृत, सामाजिक विज्ञान** (Sanskrit, Social Studies/ Social Science) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (बीए/बी.एस.सी) एवं बी.एड डिग्री और सी.टी.ई.टी |
| **विशेष शिक्षक** (Special Educator) | 1. Graduate with B.Ed. (Special Education) or B.Ed. with 2 years diploma with Special Education. or post Graduate professional diploma in Special Education. or any other equivalent Qualification approved by Rehabilitation Council of India 2. Desirable: CTET(Paper-II) conducted by Govt.of India |
| **व्यावसायिक प्रशिक्षक** (Vocational Instructor | 1. B.E, B.Tech/M.Tech (Electronic & Communication Engineering) 2. Desirable: Minimum One Year Experience. |

**साक्षात्कार दिवस :** 9.10.2025 **(गुरुवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/-**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**
**उरण जिला-रायगढ़ (महाराष्ट्र)/ Uran Dist.-Raigad (MH)**

# अतिवृष्टीच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

## शेतकऱ्यांचे उरण तहसील कार्यालयात निवेदन

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरात सप्टेंबर महिनाअखेरीस झालेल्या परतीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या भात पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाईची मदत मिळावी, यासाठी चिरनेरचे कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील व पोलीस पाटील संजय पाटील यांनी शेतकऱ्यांच्या वतीने उरण तहसील कार्यालयात सोमवारी (दि.२९) निवासी नायब तहसीलदार महेश पाटील यांना हे लेखी निवेदन दिले आहे.



उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनाही या निवेदनाची प्रत देण्यात आली आहे. उरण तालुक्यात औद्योगीकरण झपाट्याने वाढत असले तरी आजही या भागातील अनेक गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात भात पिकांची शेती करत आहेत. यावर्षी भात शेतीला पोषक असणारा पाऊस झाल्यामुळे भाताचे पीक मोठ्या प्रमाणात आले होते, परंतु परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर भात शेतीची नासाडी केली आहे.

याआधी भात पिकांवर पडलेल्या रोगांच्या प्रादुर्भावातून या तालुक्यातील शेतकरी सावरतोय, तोच परतीच्या पावसाने सध्या या तालुक्यात दमदार हजेरी लावल्याने भाताची पिके जमिनीवर आडवी झाली आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. एकंदरीत पाऊस असाच पडत राहिला. तर हातातोंडांशी आलेला घास परतीचा पाऊस हिरावून घेईल. याची शेतकऱ्याना भीती वाटत आहे.

जमिनीवर पडलेल्या भाताच्या दाण्याला मोड येण्याची वेळ आली असून, काही भातपिके हि पोटरीला येण्याआधीच कोसळून पडली आहेत. त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. दरवर्षी दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात होते. त्यानंतर दिवाळी पूर्वी बांधणी करून पूर्ण होत असते. मात्र पावसाच्या भीतीने कापणी बांधणीची कामे लांबणीवर जातील असे मत येथील शेतकऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे.

पावसामुळे शेतात पाणी असल्यामुळे उभी पीके जमीनदोस्त झाली असून, चिरनेर परिसरातील असंख्य गावे जंगल परिसरात असून येथे रानडुक्कर व माकडांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ही जनावरे शेतात हैदोस घालत असून, उरल्या सुरल्या पिकांचे नुकसान करत आहेत, याचाही मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून, शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या भात शेतीचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करीत आहे.

# उरण पोलिसांकडून जासई येथे विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना उरण वाहतुक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी वाहतुक नियमविषयक व्याख्यानात महत्वपूर्ण असे वाहतूक नियमांचे धडे दिले.

याचा अधिकाधिक फायदा सर्वच स्तरातील नागरिकांना व्हावा यासाठी सदरच्या व्याख्यानात शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनींनी आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना करण्यात आलेल्या मार्गदर्शनातून वाहतूक नियमांची योग्यतेने अंमलबजावणी व्हावी हा मुख्य हेतू असल्याचे सांगितले.



तर सदरच्या व्याख्यानातील वाहतुक नियमांबददलची माहिती आपापल्या घरी जाऊन पालकांना तसेच नातेवाईक आणि मित्रमंडळींना सांगावी. जेणेकरून कोणतेही वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत प्रबोधन प्रबोधन होईल.सदरचे व्याख्यानातील वाहतुकीच्या नियमांचे धडे विद्यार्थी,विद्यार्थिनींनी अगदी लक्षपूर्वक व शांततेने ऐकून उरण वाहतूक पोलिसांना सहकार्य होईल,अशी सकारात्मक भूमिका घेण्याचा निश्चय जासई विद्यालयातील सर्वच्या सर्व उपस्थित ९०० विद्यार्थ्यांनी केला असल्याचे उरण वाहतूक शाखेचे अतुल दहिफळे यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बौद्ध धम्माच्या संदेशाला उजाळा देत पनवेल परिसरात यंदा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात पार पडला. यासाठी शहरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक संघटनांनी पुढाकार घेतला होता.

नवीन पनवेलमधील भीमप्रेरणा सांस्कृतिक केंद्र, आम्रपाली बौद्ध विहार आणि खारघरमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद, तथागत महाविहार सामाजिक संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला हार अर्पण करून सुरुवात करण्यात आली.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थित होती. दरम्यान, अनेक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यात विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने बुद्ध वंदना, बौद्ध पूजन, व्याख्याने, मार्गदर्शनपर सभा तसेच समाज ऐक्य वाढविणारे विविध कार्यक्रम आयोजनही करण्यात आले होते.

# निवड ग्रंथांची यादी प्रसिद्ध

**नवी मुंबई :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून राबविण्यात येणाऱ्या ५०व्या ग्रंथभेट योजनेंतर्गत सन २०२३ मध्ये प्रकाशित व संचालकांनी निश्चित केलेल्या नियमावलीनुसार निवड झालेल्या एक हजार ३८५ ग्रंथांची यादी जाहीर करण्यात आली आहे. सूचना/ हरकती /आक्षेप असल्यास १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ग्रंथालय संचालनालयाकडे पाठवाव्यात, अशी माहिती प्र. ग्रंथालय संचालक यांनी दिली आहे.

ही संपूर्ण यादी www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर २६ सप्टेंबर २०२५ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.







**पनवेल : साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर पनवेल परिसरात अनेक ठिकाणी श्री गणेशाचे मंगलमय आगमन झाले. ही परंपरा अनेक वर्षांपासून मोठ्या श्रद्धेने आणि अत्यंत श्रद्धेने जोपासली जात आहे. त्यानुसार खारकोपर, शिवाजीनगर आणि न्हावेखाडी परिसरात विराजमान झालेल्या गणरायांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, कृष्णाशेठ ठाकूर, भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, रतनशेठ भगत, सी.एल. ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.**

# बीएसएनएलचा रौप्य महोत्सव साजरा



**पनवेल : वार्ताहर**

भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) ने आपल्या रौप्य महोत्सव आणि बीएसएनएल दिनाचा भव्य उत्सव संपूर्ण भागात मोठ्या उत्साहात आणि सहभागात साजरा केला. हा उत्सव दूरसंचार क्षेत्रात देशाच्या सेवेत २५ यशस्वी वर्षांची पूर्ती दर्शवणारा होता.

या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण मोहिमेने झाली, ज्यातून बीएसएनएलच्या हरित आणि शाश्वत भविष्यासाठीच्या बांधिलकीचा पुनःसंवाद झाला. कर्मचारी आणि मान्यवरांनी उत्स्फूर्तपणे रोपे लावण्यात सहभाग घेतला, जे विकास आणि पर्यावरणावरील जबाबदारीचे प्रतीक होते. बीएसएनएलच्या सेवा आणि त्याच्या स्वदेशी ओळखीबाबत जनजागृती करण्यासाठी एक बाइक रॅली आयोजित करण्यात आली होती. यामधून बीएसएनएलकडून दिल्या जाणाऱ्या विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या दूरसंचार सेवांचा प्रचार करण्यात आला.

विशेष समारंभात, एंटरप्राइज बिझनेस (EB) ग्राहक आणि टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर्स (TIPs) यांना त्यांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि भागीदारीबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांनी बीएसएनएलच्या दूरसंचार प्रणालीला बळकटी देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

# आवरे येथील मर्दनगडावर दसऱ्यानिमित्ताने पूजन

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभाग व मर्दनगड संवर्धन समिती आवरे यांच्या माध्यमातून मर्दन गडावर दसरा साजरा करण्यात आला.दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभागाने परंपरा जोपासत आवरे येथील मर्दनगडावर दसरा साजरा केला.याप्रसंगी मर्दनगडावरील आई एकविरा मातेच्या मंदिरात देवीची ओटी भरली व पूजन करून महाराष्ट्रावर आलेल्या ओल्या दुष्काला विरुद्ध लढण्याचे बल मागितले. इडा पिडा टळू दे बलिचे राज्य येऊ दे अशी मनोभावना केली. त्यानंतर गडाच्या परिसरात असलेल्या भगव्या झेंड्याचे पूजन केले व शस्त्रपूजन केले.



दुर्ग संवर्धन करण्यासाठी सुबुद्धी दे व सर्व दुर्ग सेवकांचे आरोग्य सुस्थितीत राहो अशी अपेक्षा व्यक्त केली.सह्याद्री प्रतिष्ठान उरण व मर्दनगड संवर्धन समिती आवरे यांच्या संयुक्त विद्यमाने मर्दानगडावर भविष्यात रस्तेआणि अन्य विकासकामे करण्याचा संकल्प करून यावेळी उपस्थित कौशिक ठाकूर, महेश गावंड, सुशील पाटील, प्रितेश कोळी अभिषेक ठाकूर विनोद ठाकूर, दिपेश ठाकूर व इतर पदाधिकारी उपस्थित होते. सह्याद्री प्रतिष्ठान पुरण विभागाच्या तर्फे तमाम मायबाप जनतेला दसऱ्याच्या व विजय दशमीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# रसायनीत महाश्रमदान मोहीम





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव अंतर्गत बोरीवली गावामध्ये वडगाव ग्रामपंचायत, रिलायन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, महिला बचत गट व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.३) ऑक्टोबर रोजी बोरीवली गावात महा श्रमदान मोहिम आयोजित करण्यात आली होती. या अभियानास गावातील मंदिर, शाळा व आसपासच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगांव यांनी महाश्रमदान मोहीम यशस्वीरित्या राबविताना दिसत आहे.विशेष म्हणजे माझी वसुंधरा अभियान ४.० व ५.०मध्ये कोकण विभागात प्रथम येऊन राज्य स्थरावर पारितोषिक प्राप्त केले आहे. हे सातत्य कायम ठेवण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत वडगांव सर्व स्तरातून प्रयत्न करताना दिसत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे महाराष्ट्र शासनाने सुरू केलेले एक महत्वाकांक्षी अभियान आहे, जे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि गावांचा शाश्वत विकास साधण्यासाठी चालवले जात आहे. या अभियानात सुशासन, जलसमृद्धता, स्वच्छता, हरित विकास आणि सक्षम पंचायत यांसारख्या सात प्रमुख घटकांचा समावेश आहे आणि या स्तरांवर ग्राम पंचायत वडगांव काम करीत आहे.

या स्वच्छता अभियानात सार्वजनिक ठिकाणे, ग्राम पंचायत हद्दीतील पर्यटन स्थळे, अध्यात्मिक स्थळे, नदी किनारे, संस्थात्मक इमारती, कार्यालये, वारसा स्थळे, उद्याने यांची स्वच्छता करण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यामध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे ग्राम पंचायत अधिकारी सुहास वारे, प्रशासक विनोद चांदोरकर यांनी सांगितले. या अभियानात ग्रामपंचायत कर्मचारी, रिलायन्स कर्मचारी, महिला बचत गट, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सामाजिक संस्थेच्या माध्यमातून नवदुर्गांचा सन्मान

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी नऊ महिलांचा (नवदुर्गांचा) सन्मान करण्यात येतो. याही वर्षी संस्थेच्या माध्यमातून रँकर्स अकॅडमी, कोप्रोली चौक, उरण येथे नवदुर्गांचा सत्कार सोहळा झाला.

सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रिया सुधीर मुंबईकर, सामाजिक कार्यकर्त्या समिधा म्हात्रे, गट शिक्षणाधिकारी निर्मला घरत यांच्या हस्ते श्री गणेश पूजन झाले. प्रमुख पाहुणे आदर्श शिक्षक सुधीर मुंबईकर यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. यावेळी सदर कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेचे कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे यांनी केली. प्रस्तावनेत त्यांनी संस्थेचा थोडक्यात परिचय करून दिला.

समिधा निलेश म्हात्रे, डॉ. जागृती म्हात्रे, तृप्ती भोईर, हेमांगी म्हात्रे, निर्मला म्हात्रे, हर्षाताई ठाकूर, ॲड. माधवी पाटील, निर्मला घरत, अपर्णा म्हात्रे या नवदुर्गांचा शाल गुलाब पुष्प प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह, साडी देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, सचिव प्रेम म्हात्रे, सह सल्लागार कुमार ठाकूर, सदस्य माधव म्हात्रे, प्रणित पाटील, ओमकार म्हात्रे, साहिल म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, सुरज पवार, निवेदक नवनाथ म्हात्रे यांनी व संस्थेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.





# पनवेलमध्ये रावणदहन सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने गुरुवारी (दि.२) भव्य रावणदहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मनोरंजक रामलीलादेखील सादर करण्यात आली, ज्याला पनवेलकरांनी उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद दिला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून सर्व नागरिकांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या.





दसऱ्यानिमित्त आयोजित या कार्यक्रमासाठी शहरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. प्रथम रामलीलेच्या कलावंतांनी प्रभू रामचंद्रांचे जीवन आणि रावणावरील विजयाचे प्रसंग प्रभावीपणे सादर केले. रामलीला संपल्यानंतर प्रभू श्रीरामांच्या जयघोषात रावणाच्या भव्य प्रतिकृतीचे दहन करण्यात आले.

दरम्यान, गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या नवरात्र उत्सवादरम्यान आयोजित केलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय जैन, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, प्रशांत जुंजारराव, उल्हास झुंजारराव, प्रवीण मोरबाळे, रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, स्वाती कोळी, निशू पावसकर आदी उपस्थित होते.

# माथेरानमध्ये धनगर समाजाचा मेळावा





**माथेरान : प्रतिनिधी**

विजयादशमीच्या शुभदिनी कर्जत तालुक्यातील हरहर चांगभले धनगर समाजाचा भव्य मेळावा माथेरान शहरात आयोजित करण्यात आला होता.

माथेरान धनगर समाजाचे शहर अध्यक्ष राकेश कोकळे, महिला अध्यक्ष संगीता रामचंद्र ढेबे यांच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन याठिकाणी करण्यात आले होते.

माथेरान उदयास येण्यापूर्वी ब्रिटिशांना घेऊन एक धनगर या टापूवर आला होता तसेच पूर्वी धनगरांची गाय मंदिराच्या ठिकाणी पान्हा सोडत होती. त्यामुळे येथे पिसारनाथ मंदिरावर पुजारी म्हणून धनगराला मान दिला जातो. या मंदिरात २ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला सकाळी ९ वाजता यथोचित पूजा करण्यात आली.

यानंतर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौकातून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. या मिरवणुकीत कर्जत तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने हजर होते. येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषणा देत ढोल ताशांच्या गजरात व हळद उधळत येथील मध्यवर्ती ठिकाण श्रीराम चौकात धनगरी नृत्याविष्कार दाखवत मिरवणूक पिसारनाथ मंदिराच्या दिशेने कूच करत निघाली. दुपारी १ वाजता या मिरवणुकीची मंदिरात आरतीने सांगता करण्यात आली.

दरवर्षी या मेळाव्याने माथेरान शहरात जत्रेचे स्वरूप येते, तर धनगर समाज बांधवांच्या पारंपरिक गजानृत्याने सर्व गावकऱ्यांचे आणि पर्यटकांचेही लक्ष वेधले जाते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष संतोष आखाडे, तालुका अध्यक्ष रामदास कोकरे, माथेरान अध्यक्ष राकेश कोकळे, महिला अध्यक्ष संगीता ढेबे तसेच समाजातील असंख्य कार्यकर्ते यांनी मेहनत याही वर्षी हा मेळावा यशस्वी केला.

# श्री धावीर महाराजांचा पालखी सोहळा

## रायगड पोलिसांनी दिली सशस्त्र मानवंदना



**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास शुक्रवारी (दि. ३) पहाटे मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या वेळी रायगड पोलिसांच्या वतीने रोहा निरीक्षक मारुती पाटील व पथकाने महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली.

या सोहळ्यास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, प्रांत खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजय मोरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, संतोष पोटफोडे, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, विश्वस्त नितीन परब, समीर सकपाळ, लालताप्रसाद कुशवाह, आनंद कुलकर्णी, महेश सरदार, मयुर दिवेकर, संदीप सरफळे, महेश कोलटकर, चंद्रकांत पार्टे, आप्पा देशमुख, हेमंत कांबळे, राजेंद्र पोकळे, अमित उकडे, राजेश काफरे, रवींद्र चाळके, निलेश शिर्के, प्रशांत देशमुख आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

दोन वर्षांपूर्वी मंदिरासमोरील सभामंडप हटवून त्या ठिकाणी दोन्ही बाजूला बैठक गॅलरी करण्यात आल्याने भक्तांची गेली अनेक वर्षांची गैरसोय दूर झाली आहे. भक्तांना गॅलरीत बसून मानवंदना पाहता आली.

या उत्सवानिमित्त मंदिराचा संपूर्ण परिसर विविधरंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आलेला. पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळ्यांनी वातावरण प्रसन्न झालेले. भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळींच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर महाराजांची पालखी पारंपरिक वाद्यांच्या गजरात मार्गस्थ झाली. शहरातील ठरलेल्या मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्थांना दर्शन देत पालखी दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिरात परतणार आहे. या वेळी पुन्हा महाराजांना पालीस मानवंदना देण्यात येते.

पालखीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी जैन संघटना, रोटरी क्लब, प्रकाश जैन आदी विविध सामाजिक मंडळांमार्फत शहरात ठिकठिकाणी थंडपेये, चहा आणि अल्पपोहाराची व्यवस्था करण्यात आलेली, तर येथील आशीर्वाद मंडळातर्फे भाविकांसाठी गेली अनेक वर्षे सुरू असलेली मोफत भोजन व्यवस्था यंदा करण्यात आलेली आहे.



# जुने माणगाव संगमेश्वरनगर मंडळातर्फे नवरात्रोत्सव उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगर ग्रामस्थ व महिला मंडळातर्फे सलग चौथ्यावर्षी कै. प्रवीण (विकी) रवींद्र भोईर यांच्या स्मरणार्थ आयोजित नवरात्रोत्सव विविध कार्यक्रमांनी मंडळाचे संस्थापक सुभाष पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री हनुमान मंदिर संगमेश्वर नगर जुने माणगाव या ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला.

घटस्थापना ते विजयादशमीपर्यंत या कालावधीत मंडळातर्फे दररोज दांडिया रास व अन्य विविध कार्यक्रम झाले. या नवरात्रोत्सवाला राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे कोकण मुख्य प्रवक्ते ॲड.राजीव साबळे, उद्योजक विजयशेठ मेथा, विद्यमान नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, आनंदशेठ यादव, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र मोरे, माजी नगरसेविका माधुरी मोरे, युवा उद्योजक सुभाष दळवी यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या.



# चौलमध्ये रस्त्याची साईडपट्टी खचली



**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेले दिवस पडलेल्या पावसाच्या संततधारेने चौलमध्ये मुख्यः रस्त्याची साईडपट्टी धुवून गेली. त्यामुळे वाहनांसाठी हे अपघातास निमंत्रण ठरत आहे.

चौल मुखरी गणपतीनजीकच्या रस्त्याची साईडपट्टी पावसाच्या पाण्यात वाहून गेली असून तेथील पाण्याच्या निचरा होण्यासाठी बांधलेल्या गटाराच्या बाजूकडील माती वाहून गेल्याने रस्त्याची साईडपट्टीसुद्धा खचली. या ठिकाणी खोलगट भाग असल्याने तसेच या मुख्यः रस्त्याने मोठी वाहने जा-ये करत असल्याने तेथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे, कारण या रस्त्यावरील साईडपट्टी निघून गेल्याने रस्ता अरूंद झाला असून मोठी दोन अवजड वाहने पास करणे वाहनचालकांची तारेवरची कसरत बनले आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याच्या साईडपट्टीचे काम करावे, व तेथील गटारसुद्धा नव्याने बांधण्यात यावेत, अशी मागणी प्रवासीवर्ग, वाहनचालक व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

# माणगावात खासदार तटकरेंनी घेतली नाराज कार्यकर्त्यांची भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी माणगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नाराज कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर केली असून या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक आनंदशेठ यादव यांनी दिली.

माणगावात राष्ट्रवादीची बैठक कुणबी भवनात प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांनंतर पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली होती. हे नाराज कार्यकर्ते दसऱ्यानंतर सीमोल्लंघन करणार असल्याची चर्चा होती. याबाबतचे वृत्त विविध वृत्तपत्रांतून तसेच सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्यावर याची दखल खासदार तटकरे यांनी घेऊन नाराज कार्यकर्त्यांची माणगाव शासकीय विश्रामगृह या ठिकाणी बैठक बोलावली. या बैठकीत नाराज कार्यकर्त्यांनी आपले म्हणणे मांडताना सांगितले की, साहेब, जुन्या कार्यकर्त्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये. आम्ही सारे जुने कार्यकर्ते गेली अनेक वर्ष तन, मन, धन लावून पक्षाचे इमानेइतबारे काम करीत आलो आहोत. पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करताना आम्हाला विश्वासात घेतले पाहिजे होते. यावर खासदार तटकरे यांनी, आपल्या सर्वांची योग्य ती दखल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जरूर घेईल. मी असेन, आदिती, अनिकेत तुमच्या सर्वांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभे असून नाराजी बाजूला ठेवून पक्ष संघटनेचे काम हातात हात घालून जोमाने सुरु ठेवा, असे आवाहन केले.

या बैठकीला नगरसेवक आनंदशेठ यादव, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन वाढवळ, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्ष योगिता चव्हाण, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, युवा नेते सुमित काळे, सोशल मीडियाच्या केशरी हिरवे, चेतन गवाणकर, विठोबा पालकर, राकेश पवार आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये रस्ता काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील प्रति पंढरपूर आळंदी ते फायर ब्रिगेडपर्यंतचा रस्ता दीर्घ काळापासून खड्डेमय झाल्याने वाहनचालक व नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. संबंधित रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचा भूमिपूजन सोहळा आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते पार झाला.

या वेळी बोलताना आमदार थोरवे यांनी, कर्जत शहराच्या वाहतुकीचा कणा असलेल्या या रस्त्याच्या दुरूस्तीची तातडीची गरज होती. नागरिकांच्या मागणीनुसार प्राधिकरणकडून निधी उपलब्ध करून घेतला आहे. आता तातडीने काँक्रीटीकरणाचे काम सुरू होणार असून लवकरच नवीन श्रीराम पुलाचे कामदेखील सुरू केले जाईल.



**माणगाव : राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी मंगळवारी माणगाव नगरपंचायत हद्दीतील श्री स्वयंभू संगमेश्वर मंदिर येथील नवरात्रोत्सवाला भेट दिली. त्या वेळी मंत्री गोगावले यांचे नगरसेवक दिनेश रातवडकर, सचिन गोरेगावकर, मंडळाचे दीपक म्हशीलकर, अन्य पदाधिकारी, सभासद तसेच महिला मंडळाने स्वागत केले.**

# माणगावचे युवा नेते निलेश थोरे यांना युवारत्न पुरस्कार जाहीर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील तरुणांचे स्फूर्तिस्थान तथा भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश कुंडलिक थोरे यांना कै.डी.ए. जगताप आणि रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दि म्हसळा टाइम्स राज्यस्तरीय युवारत्न या पुरस्कार जाहीर झाला आहे. थोरे यांना तशा आशयाची माहिती व्यवस्थापकीय संपादक रमेश पोटले व सल्लागार संपादक सुनील चिटणीस यांनी दिली .

कै.डी.ए. जगताप आणि रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अनेक उपक्रम राबविले जातात. काव्य संमेलन, शैक्षणिक उपक्रम, कवी लेखक यांना दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी संधी देणे, राज्यस्तरीय साहित्य संमेलन आणि इतर युवा युवतींकरिता उपक्रम आयोजित केले जातात तसेच समाजातील कर्तृत्ववान गौरवशाली कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या वर्षी आयोजकांनी नामांकनासाठी केलेल्या आवाहनास उत्तम प्रतिसाद लाभला. या प्रस्तावांमधून आयोजकांच्या कार्यकारी समितीने १४व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि म्हसळा टाइम्स राज्यस्तरीय युवा रत्न या पुरस्कारासाठी माणगावचे निलेश थोरे यांची निवड केली आहे.

निलेश थोरे यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा क्षेत्रात काम आहे. ते बहुजन समाजातील गोरगरीब जनतेला, विद्यार्थ्यांना आपल्या परीने मदतीचा हात देत असतात. संकटकाळात तसेच पूर परिस्थितीत ते आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळी धाव घेऊन मदत करतात. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना दि म्हसळा टाइम्स राज्यस्तरीय युवारत्न या पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण सोहळा ११ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ७.३० यावेळेत श्री दादासाहेब धनराज विसपुते सभागृह, देवद-विचुंबे, नवीन पनवेल (पूर्व) या ठिकाणी होणा आहे. दरम्यान, थोरे यांना पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

# वाघेरी येथे ग्रामस्वच्छता आणि पालखी सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेच्या जय जवान जय किसान माध्यमिक विद्यालय वाघेरी, स्थळ वारंगी विद्यालयात नवरात्र उत्सवानिमित्त शारदोस्तव पालखी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

शिक्षण आपल्या दारी या संकल्पनेंतर्गत शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी किल्ले रायगड पायथ्याशी अतिदुर्गम अशा रायगडवाडी आदिवासीवाडीत सरस्वतीची पालखी मिरवणूक काढली. सुंदर अशा नयनरम्य निसर्ग सानिध्यात सर्व घरोघरी रांगोळी काढल्या होत्या.

सर्व वनवासी बंधू-भगिनींनी मनोभावे पुजा केली. खालूबाजा व लेझीमच्या तालात सर्व गावकरी व शाळेचे विद्यार्थी, शिक्षकांनी तल्लीन होऊन शारदोत्सवाचा आनंद घेतला. गावात शाळेतील विद्यार्थी व गावकरी यांनी स्वच्छता केली तसेच स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. गावकऱ्यांनी सर्वांना अल्पोपहार दिला. मुख्याध्यापक प्रकाश देवरुखकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी केला.



# शिक्षिका अपूर्वा जंगम राज्य शासनाच्या पुरस्काराने सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील आदर्श शिक्षिका अपूर्वा जंगम यांना महाराष्ट्र शासनातर्फे सन २०२४-२५ या वर्षातील क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्काराने मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व एक लाख १० हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



समारंभास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शालेय शिक्षण प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, शिक्षण संचालक महेश पालकर, पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक कृष्णकुमार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

अपूर्वा जंगम यांनी कुटुंबियांसमवेत पुरस्कार स्वीकारला. जंगम या गुणवंत शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. सध्या त्या माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणे या ठिकाणी सहाय्यक शिक्षिका म्हणून सेवेत कार्यरत आहेत. विद्यार्थी हा चांगला घडला पाहिजे याकरिता त्यांना विद्यार्थीदशेपासूनच संस्कारक्षम असे शिक्षण देण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत. शिवाय समाजसेवी उपक्रमांमध्ये रॅली, वृक्षारोपणासारखे कार्य हाती घेऊन सर्वांनाच प्रोत्साहित करीत असतात. याचबरोबर निवेदिकाची भूमिका बजावतात.

नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या शिक्षिका म्हणून जंगम यांनी नावलौकिक मिळविला आहे. त्याचबरोबर माणगावात दरवर्षी शिवजयंतीनिमित्त होणाऱ्या रक्तदान शिबिरात त्या स्वतः रक्तदान करून इतर महिलांनाही रक्तदानासाठी प्रोत्साहित करीत असतात. त्यांच्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन त्यांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित केले.

या पुरस्काराबाबत प्रसारमाध्यमांजवळ बोलताना अपूर्वा जंगम यांनी सांगितले की, या पुरस्कारात मला १ लाख १० हजार रुपये बक्षीसरूपी रक्कम मिळाली आहे. या रकमेतील २५ हजार रुपये ज्या शाळेत गेली सहा वर्षे मला माझे कर्तृत्व सिद्ध करता आले त्या राजिप कशेणे शाळेसाठी दान देणार आहे आणि उर्वरित ८५ हजार रुपयांचे बँकेत सर्टिफिकेट काढणार व दरवर्षी त्यावर येणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत किंवा वृद्धाश्रमात गरजेच्या वस्तू वाटप करणार आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# भारताची विंडीजवर भरभक्कम आघाडी

## राहुल, जुरेल, जडेजा यांची शतके





**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसर्‍या दिवशी भारतीय फलंदाजांनी वर्चस्व राखले. दुसर्‍या दिवसाचा खेळ संपला तेव्हा टीम इंडियाने आपल्या पहिल्या डावात पाच गडी गमावून ४४८ धावांचा डोंगर उभा केला आहे. सध्या रवींद्र जडेजा १०४ आणि वॉशिंग्टन सुंदर नऊ धावा काढून नाबाद आहेत.

भारतीय संघासाठी शुक्रवारचा (दि. ३) दिवस उत्कृष्ट ठरला. २ बाद १२१ धावांच्या पुढे खेळायला सुरुवात करत टीम इंडियाने सामन्याच्या दुसर्‍या दिवसाअखेर तब्बल ३२७ धावा वसूल केल्या. यादरम्यान, शुबमन गिल, केएल राहुल आणि ध्रुव जुरेलच्या रूपात तीन महत्त्वाचे बळी गमावावे लागले.

सामन्याच्या दुसर्‍या दिवसाची सुरुवात शुबमन गिलने दमदार अर्धशतक झळकावत केली, मात्र तो ५० धावांवर बाद झाला. त्यानंतर केएल राहुलने आपली संयमी फलंदाजी सुरू ठेवत आपल्या कसोटी कारकिर्दीतील ११वे शतक पूर्ण केले. १२ चौकारांच्या मदतीने १०० धावा करून तो माघारी परतला.

राहुल बाद झाल्यानंतर मैदानात आलेल्या युवा ध्रुव जुरेलने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पहिले शानदार शतक झळकावले. १५ चौकार आणि तीन उत्तुंग षटकारांच्या मदतीने त्याने १२५ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यानंतर 'सर' रवींद्र जडेजाने आपला फॉर्म कायम ठेवत कसोटी कारकिर्दीतील सहावे शतक पूर्ण केले. जडेजा १०४ धावांवर खेळत आहे. वेस्ट इंडिजने आपल्या पहिल्या डावात केवळ १६२ धावा केल्या होत्या, त्यामुळे टीम इंडियाची एकूण आघाडी आता २८६ धावांपर्यंत पोहचली आहे. सामन्याच्या तिसर्‍या दिवशी ही आघाडी आणखी वाढवण्यासाठी भारतीय संघ प्रयत्न करेल.

दरम्यान, पहिल्या कसोटीत असे काही पहायला मिळाले, जे यापूर्वी सुमारे ६१ वर्षांपूर्वी घडले होते. कर्णधार शुभमन गिल १०० चेंडूंमध्ये पाच चौकारांच्या मदतीने ठीक ५० धावा करून बाद झाला. केएल राहुलने १९७ चेंडूंमध्ये १२ चौकारांसह ठीक १०० धावांची खेळी साकारली. भारतीय संघाच्या दोन फलंदाजांनी कसोटीच्या एका डावात बरोबर ५० आणि १०० धावा करून बाद होण्याची घटना सुमारे ६१ वर्षांनी घडली आहे. यापूर्वी हा कारनामा सन १९६४मध्ये झाला होता. त्या वेळी दिल्लीमध्ये इंग्लंडविरुद्ध कसोटी सामना सुरू होता. भारताकडून एमएल जयसिम्हा यांनी ५० आणि बुधी कुंदरन यांनी १०० धावांची खेळी केली होती.



## खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची बॉक्सिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सात सुवर्ण, आठ रौप्य आणि १३ कांस्य अशी एकूण २८ पदके जिंकली आहेत.

सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यापैकी करन दीपक सुराडकर, वेद संजय चव्हाण, सुमित मुकेश चौधरी, प्रित विलास भोईर, नम्रता सुनील सलते, इशिता प्रशांत शिंदे, अल्फिया शहजाद अन्सारी यांची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. सर्व विजेत्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## 'सीकेटी'च्या वेद ठाकूरला कुस्ती स्पर्धेत 'कांस्य'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा परिषद, क्रीडा अधिकारी कार्यालय आणि पोलीस मुख्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालय, रोडपाली कळंबोली येथे आयोजित विभागीय फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील वेद मुकेश ठाकूर (बारावी विज्ञान) याने कांस्यपदक प्राप्त केले.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांनी वेद ठाकूरचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची मिळाली संधी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमधील शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर एक ऐतिहासिक क्रिकेट सामना रंगला. अकॅडमीच्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची अनमोल संधी मिळाली. ते न्यूझीलंडमधील रोटुरुआ बॉईज हायस्कूलच्या संघाविरुद्ध भिडले. पहिल्या सिझनची ही पहिली मॅच अंडर-प्रकारात खेळवण्यात आली. दोन्ही संघांनी उत्कृष्ट कामगिरी दाखविल्याने सामना अत्यंत रोमांचक झाला.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर, अकॅडमीचे प्रशिक्षक मनोज लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या सामन्यात शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या संघाने प्रतिस्पर्धी संघासमोर ११० धावांचे लक्ष्य ठेवले होते. अकॅडमीच्या गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. विशेषतः जिझ्नेश कडू याने पाच बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली. फलंदाजीत कर्णधार शिवम मोकल याने २१ धावा केल्या. शिवम मोकल आणि जिझ्नेश यांच्यासह रूद्र मोकल, हिमांग धोका, हर्ष ठाकूर, पार्थ पाटील, निध्रुव लोखंडे यांनीही संघासाठी मोलाची कामगिरी केली. या सामन्यात न्यूझीलंड संघ विजयी झाला असला तरी स्थानिक मुलांनी संयमाचा खेळ खेळला आणि प्रतिस्पर्धी संघाला जिंकण्यासाठी संघर्ष करावा लागला ज्यामुळे सामन्याची चुरस अखेरपर्यंत कायम राहिली.

अकॅडमीचे प्रशिक्षक मनोज लोखंडे यांच्या विशेष प्रयतांमुळेच न्यूझीलंडच्या संघाला आमंत्रित करणे शक्य झाले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संघाविरुद्ध खेळण्याचा अनुभव मिळाला.

## राष्ट्रीय पिंच्याक सिलाट स्पर्धेत अर्णव रावकरला रौप्यपदक

**नागोठणे : बातमीदार**



कर्नाटक राज्यातील कोप्पल येथे झालेल्या १३व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलाट चषक स्पर्धेत नागोठणे येथील रायगडचे नेतृत्व करणारा अर्णव श्रीकांत रावकर याने उत्कृष्ट कामगिरी केली आणि रौप्यपदकाचा मानकरी ठरला.

स्पर्धेत जम्मू-काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंतच्या संपूर्ण देशभरातील विविध राज्य व केंद्रशासित प्रदेशांतील अनेक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या चषकात प्री-टीन, प्री-ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर अशा विविध गटांमध्ये सामने घेण्यात आले. या स्पर्धेत रायगडचे नेतृत्व करणारा अर्णव रावकर याने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले व नागोठण्यासह रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या वेळी अर्णव याने या यशामागे प्रशिक्षकांसह मला नेहमीच प्रोत्साहन देणारे माझे आजोबा निवृत्त सैनिक उदंड रावकर तसेच आई-वडिलांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. च्या यशाबद्दल रायगड पिंच्याक सिलाट संघटनेचे अध्यक्ष, सचिव, अन्य पदाधिकारी व सदस्य तसेच विविध स्तरावरून अणर्वचे अभिनंदन होत आहे.



## जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत गव्हाण विद्यालयाचा डंका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ही स्पर्धा म्हसळा येथील मेंदडी येथे झाली. स्पर्धेत पोलादपूर, कर्जत, पनवेल आणि महाड तालुक्याचा उत्साह भरभरून पहायला मिळाला.

स्पर्धेत गव्हाण शाखेने देदीप्यमान यश मिळवले. यात आर्टिस्टिक डान्स १४ वर्षे वयोगटात करण नितीन सूर्यवंशी, सार्थक शांताराम काटे, १९ वर्षे वयोगटात परवेज रमजान अली खान, आर्टिस्टिक पेअर फैजान मो.कौशर आणि अभिजीत हनुमंतराव जाधव, रीदमिक पेयर डान्स दिव्या बालाजी केंद्रे आणि दिक्षा शरद म्हात्रे, रिदम एक पर डान्स भाविक तुळशीदास कोळी आणि आदित्य संजय कुराडे यांनी सुवर्णपदक पटकाविले.

१९ वर्षे गट ट्रॅडिशनल आणि आर्टिस्टिक सिंगल डान्स या दोन्हीमध्ये तेजल संदीप मगर, १७ वर्षे वयोगट रीदमिक पेअर डान्स अजिंक्य प्रकाश पाटील आणि श्रेयस शशिकांत पाटील, तर १४ वर्षे वयोगटात आर्टिस्टिक पेयर डान्समध्ये पिहू सागर कडू व हर्षिता हरिराम जोगी यांनी रौप्यपदक मिळवले.

सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक सुरेश सखाराम पारखे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना सारिका ठाकूर व हर्षला पाटील यांचे तालुकास्तरावर सहकार्य लाभले.

या यशाबद्दल स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्य जोत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनियर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शुबमन गिलची दमदार कामगिरी

**अहमदाबाद** : वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल याने दमदार अर्धशतक झळकावले आहे. यासह तो २१व्या शतकात घरच्या मैदानावर कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच कसोटी डावात ५० किंवा त्याहून अधिक धावा करणारा पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे. गिलच्या आधी घरच्या मैदानावर कर्णधार म्हणून पहिल्याच डावात ५०+ धावांचा टप्पा ओलांडणारे अखेरचे भारतीय कर्णधार सुनील गावसकर होते. त्यांनी १९७८मध्ये वानखेडे स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध २०५ धावांची शानदार खेळी केली होती.

## मायदेशात बुमराहचे विकेट्सचे अर्धशतक

### श्रीनाथला टाकले मागे; कपिल देवच्या विक्रमाशी बरोबरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुरुवारी सुरू झालेल्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी वेस्ट इंडिजला पहिल्या डावात निष्प्रभ केले. विंडीजचा संपूर्ण संघ १६२ धावांवर गारद झाला. भारताकडून मोहम्मद सिराजने सर्वाधिक चार बळी घेतले, तर जसप्रीत बुमराहने तीन बळी मिळवत एका खास विक्रमाची नोंद केली.

बुमराहने वेस्ट इंडिजविरुद्ध तिसरा बळी घेताच मायदेशात त्याचे ५० कसोटी बळी पूर्ण झाले. त्याने हा पराक्रम केवळ २४व्या डावात केला. यासह तो भारतीय भूमीवर सर्वात जलद ५० कसोटी बळी घेणारा संयुक्तपणे अव्वल क्रमांकाचा गोलंदाज बनला आहे. या कामगिरीत बुमराहने भारताचे माजी वेगवान गोलंदाज जवागल श्रीनाथ यांच्या विक्रमाची बरोबरी साधली आहे.

या यादीत दुसर्‍या स्थानावर कपिल देव असून त्यांनी २५ डावांमध्ये हा टप्पा गाठला होता. याव्यतिरिक्त इशांत शर्मा आणि मोहम्मद शमी यांनी २७-२७ डावांमध्ये भारतीय भूमीवर ५० कसोटी बळी पूर्ण केले होते.

## महिला वर्ल्डकपमध्ये बांगलादेशकडून पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव

**कोलंबो : वृत्तसंस्था**

महिला एकदिवसीय विश्वचषकातील पहिल्याच सामन्यात पाकिस्तान महिला संघाला लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. बांगलादेश महिला संघाने ३१ षटकांमध्ये पाकिस्तानवर सात विकेट्सने सहज विजय मिळवला. पाकिस्तानचा संघ प्रथम फलंदाजी करताना १२९ धावांत सर्वबाद झाला होता.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला, मात्र हा निर्णय बांगलादेशच्या बॉलर्सच्या पथ्यावर पडला. पाकिस्तानच्या एकाही खेळाडूला मोठी खेळी साकारता आली नाही आणि त्यांचा डाव १२९ धावात ३८.३ ओव्हरमध्येच आटोपला. बांगलादेशतर्फे शोरना अख्तेरने ३.३ ओव्हरमध्ये तीन निर्धा षटकांसह केवळ पाच धावांत तीन विकेट्स पटकावल्या, तर मारुफा अख्तेर आणि नहिदा अख्तेर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

बांगलादेशने या लक्ष्याचा पाठलाग करताना फरगाना हकला झटपट गमावले. शर्मिन अख्तेर १० धावा करून बाद झाली, पण रुब्या हैदरने सूत्रधाराची भूमिका स्वीकारली. बांगलादेशसाठी वनडे पदार्पणात अर्धशतक झळकावणारी रुब्या ही केवळ तिसरी बॅटर ठरली. कर्णधार निगर सुलतानाने २३ धावांची खेळी केली. तर रूबया हैदर ५४ धावांची अर्धशतकी खेळी करत नाबाद माघारी परतली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com